

आनंद सागर
मंगल कार्यालय
शाकाहारी करिता
एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.
* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस
* गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम
आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719



# गोदातीर समाचार

स्थापना-१९६२
RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



जोशी बंधू यांचे ..!!
शंकर भट्ट मंगल कार्यालय

मंगल कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली आपल्या सेवेत..!!
(लग्न, साखरपुडा, मुंज, रिसेप्शन, वाढदिवस, बारसे, डोहाळ जेवण, स्वागत समारोह व ईतर...)
पत्ता : भगवान परशुराम चौक किनवट रोड भोकर मो. क्र. 9765983335/9960659975/9881881934/9527889927



* वर्ष ६४ वे * अंक ६९ * नांदेड * गुरूवार, दि. १३ मार्च २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# एमपीएससीच्या सर्व परीक्षा मराठीत होणार

## मुख्यमंत्री फडणवीस यांची विधान परिषदेत माहिती



**मुंबई (प्रतिनिधी)–** सध्या सुरू असलेले राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन विविध मुद्द्यांनी गाजत आहेत. अशात बुधवारी विधान परिषदेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामधील विविध विषयांवरही चर्चा झाल्याचे पाहायला मिळत आहे. बुधवारी विधानपरिषदेचे सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी एमपीएससीच्या परीक्षा मराठीत घेण्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. आमदार नार्वेकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमपीएससीच्या सर्व स्पर्धा परीक्षा मराठीत घेण्याची राज्य सरकारची योजना असल्याचे स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्र्यांनी याबाबत एक्सवरही पोस्ट करत माहिती दिली आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत एक्सवर पोस्ट करत म्हटले की, विधानपरिषद सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी एमपीएससीच्या परीक्षा मराठीत घेण्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. सध्या अभियांत्रिकी आणि कृषी तांत्रिक पदांच्या परीक्षा इंग्रजीत घेतल्या जातात, कारण संबंधित पुस्तके मराठीत उपलब्ध नाहीत. मात्र, आता अभियांत्रिकी शिक्षण मराठीत घेण्यास परवानगी मिळाल्याने लवकरच या अभ्यासक्रमाची पुस्तके मराठीत उपलब्ध होतील. त्यानुसार, सर्व तांत्रिक पदांच्या परीक्षा मराठीत घेण्याचे नियोजन राज्य शासनाने केले आहे.

याचबरोबर बुधवारी विधानपरिषदेचे सदस्य सतेज ऊर्फ बंटी पाटील, अभिजित वंजारी, भाई जगताप, जयंत आसगावकर, राजेश राठोड, धीरज लिंगाडे, डॉ. प्रज्ञा सातव, मिलिंद नार्वेकर, सुनिल शिंदे यांनी एमपीएससी संदर्भात विविध प्रश्न उपस्थित केले होते. यावेळी एमपीएससीमार्फत होणारी पदभरती आणि पारदर्शकता व पेपरफुटीवरही प्रश्न विचारण्यात आले होते. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तरे दिली आहेत.

यावेळी, शासनाने रिक्त पदे भरण्यासाठी घोषणा करुनही १५ पेक्षा जास्त विभागात भरती प्रक्रिया राबविण्यात आली नाही, तसेच तलाठी व जिल्हा परिषदेची भरती प्रक्रिया राबविल्यानंतर उमेदवार पात्र होऊनही त्यांना नियुक्तीचे पत्र दिले नाही, हे ही खरे आहे का? असा प्रश्न विचारण्यात आला होता.

याला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, तलाठी तसेच जिल्हा परिषदेतील पदे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरली जात नाहीत. तसेच नियुक्ती पत्र देण्याची कार्यवाही देखिल आयोगामार्फत केली जात नाही. त्यामुळे या विषयाचा आयोगाच्या मनुष्यबळाशी कोणताही संबंध नाही, असे ते म्हणाले.

# लेंडी प्रकल्पास ९० कोटी रुपये निधी प्राप्त

## शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदानाचे वितरण व प्रकल्पाच्या घळभरणी काम सुरु करण्याचे जलसंपदामंत्री यांचे निर्देश



**नांदेड (प्रतिनिधी)–** लेंडी प्रकल्पासाठी ९० कोटी रुपये इतका निधी गोदावरी महामंडळास वितरीत झाला आहे. या निधीतून शेतकऱ्यांना प्राधान्याने सानुग्रह अनुदान वाटप व या प्रकल्पाच्या घळभरणीचे काम समांतरपणे त्वरीत सुरु करण्याचे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत.

लेंडी आंतरराज्य प्रधान प्रकल्प हा महाराष्ट्र व तेलंगना राज्याचा संयुक्त प्रकल्प आहे. या प्रकल्पाचा पाणी वापर क्षमता ५.९६ टीएमसी इतका आहे. या प्रकल्पामुळे एकूण २६ हजार ९२४ हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पास १९८५ मध्ये प्रशासकीय मान्यताप्राप्त असून प्रकल्पाची अद्यावत किंमत २ हजार १८४ कोटी रुपये इतकी आहे. प्रकल्पग्रस्तांनी सन २०११ पासून विविध मागण्यांसाठी प्रकल्पाचे काम बंद केले होते.

यात प्रमुख मागण्यांपैकी मुक्रमाबाद पूर्ण गावाचे स्वच्छ पुनर्वसन करणे, ज्या गावांमध्ये पूर्णत: जमीन उपलब्ध होत नाही तेथील प्रकल्पग्रस्त कुटूंबाना स्वेच्छा पुनर्वसन अनुदान देणे. वंशवृध्दीमुळे प्रकल्पग्रस्त कुटूंबामध्ये वाढ झाल्यामुळे वाढीव कुटूंबाना विशेष आर्थिक अनुदान देणे. शेतकऱ्यांसाठी विशेष बाब म्हणून सानुग्रह अनुदान मंजूर करणे वरील तिन्ही मागण्या मान्य झाल्या असून शासन निर्णय निर्गमित झाला आहे. याबाबत एकूण २२१ कोटी रुपयांचा निधी महसूल विभागाकडे वर्ग करुन प्रकल्पग्रस्तांना वाटप करुन यावर्षी धरणाचे काम पुनश्च सुरु करण्यात आले होते. सानुग्रह अनुदानाच्या मागणीसाठी नियामक मंडळाने २७ सप्टेंबर २०२४ रोजी १६५.११ कोटीस मंजुरी दिली. त्यानुसार १० कोटींचा निधी महसूल विभागाकडे वर्ग करण्यात आला होता.

घळभरणीसाठी तांत्रिक व प्रशासकीय दोन्ही मान्यता प्राप्त करण्यात आलेल्या होत्या. परंतु प्रकल्पग्रस्तांनी ५ फेब्रुवारी २०२५ पासून घळभरणीचे व इतर कामे पुन्हा बंद केली होती. आता इतर कामे पुन्हा सुरु करण्यात येत असून, त्या अनुषंगाने ११ मार्च २०२५ रोजी जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता अधीक्षक यांच्या समवेत बैठक संपन्न झाली. या अनुषंगाने लेंडी प्रकल्पास ९० कोटी रुपये निधी गोदावरी महामंडळास वितरीत करण्यात आला आहे.

# ग्लॅन्डर रोगाच्या प्रादुर्भावामुळे अश्व प्राण्यांची नांदेड शहरातून ये-जा वाहतूकीस प्रतिबंध

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहरामध्ये अश्ववर्गीय प्राण्यांमध्ये ग्लॅन्डर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण २००९ मधील तरतुदीनुसार नांदेड शहरामध्ये बाहेरुन येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या अश्ववर्गीय प्राण्यांची वाहतूक करण्यास प्रतिबंध केला आहे, असे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्गमित केले आहेत.

प्राण्यांमधील संक्रमण व सांसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ व ग्लॅन्डरच्या नियंत्रण व निर्मूलनासाठी राष्ट्रीय कृती योजना २०१९ अंतर्गत पाच ते दहा किलो मीटरअंतर्गत असलेल्या गावातील अश्वास सर्वेक्षण आणि नांदेड या शहरांमध्ये झालेल्या ग्लॅन्डर रोगाचा प्रादुर्भाव लक्षात घेता शहरातून बाहेर जाणाऱ्या आणि बाहेरुन येणाऱ्या अश्ववर्गीय प्राण्याची वाहतूक करण्यास या आदेशान्वये प्रतिबंध करण्यात आला आहे.

# १७ रोजी शिवरायांच्या पहिल्या मंदिराचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण



**मुंबई (प्रतिनिधी)–** भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा येथे महाराष्ट्रातील पहिले भव्यदिव्य छत्रपती शिवाजी महाराज मंदिर उभारले गेले आहे. या मंदिराचा लोकार्पण सोहळा १७ मार्च २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या निमित्ताने १४ ते १७ मार्च या कालावधीत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवक्रांती प्रतिष्ठानचे संस्थापक राजूभाऊ चौधरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज उदयनराजे भोसले यांच्यासह विविध मंत्री, आमदार, खासदार तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

१४ मार्च रोजी सकाळी विधीपूजा, गोप्रवेश आणि सामूहिक हरिपाठ होणार आहे. सायंकाळी शक्तीभक्ती शिवसंध्या या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १५ मार्च रोजी धर्मध्वज पूजन, मंदिर द्वार प्रवेश, होम हवन, महिलांसाठी हळदीकुंकू आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. सायंकाळी अभिनेत्री रुचिता लोढक यांचा विशेष कार्यक्रम आणि मी वाहिनी होते या कार्यक्रमाचे सादरीकरण (लेखन व अभिवाचन - अँड. आनंद देशमुख, अवधूत गांधी) होणार आहे. १६ मार्च रोजी शिवकालीन ललकार या भव्य ऐतिहासिक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठ्यांच्या इतिहासावर आधारित प्रबोधनपर कार्यक्रम या दिवशी सादर केला जाणार आहे. १७ मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण विधी, क्षेत्रपाल पूजन आणि होम हवन पूर्णाहुती यांसह विविध धार्मिक विधी पार पडतील. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपस्थित मान्यवरांच्या साक्षीने मंदिराचा लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे.

# आनंदाचा शिधा योजना अखेर बंद

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य सरकारची लोकप्रिय योजना आनंदाचा शिधा योजना आता बंद करण्यात आली आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना आनंदाचा शिधा ही योजना सुरू करण्यात आली होती. त्या माध्यमातून सणाच्या दिवशी राज्यातील १ कोटी ६३ लाख लोकांना याचा लाभ मिळत होता. राज्यातील तिजोरीमध्ये असलेल्या खडखडाटीमुळे ही योजना बंद करण्यात आल्याची चर्चा आहे.

आनंदाचा शिधाच्या माध्यमातून रेशनकार्डधारकांना एक किलो रवा, एक किलो साखर, एक किलो चना डाळ आणि एक लिटर पामतेल मिळत होतं. ही योजना आता बंद करण्यात आली आहे. नवीन सरकारच्या पहिल्याच अर्थसंकल्पामध्ये आनंदाचा शिधा योजनेला काहीशी बगल दिल्याचं दिसून आलं. या योजनेच्या माध्यमातून दसरा, दिवाळी, गुढीपाडवा, आंबेडकर जयंती अशा सणांच्या निमित्ताने फक्त १०० रुपयांमध्ये पाच वस्तू दिल्या जायच्या.

गोदातीर समाचार



**आज होळी सण. त्यानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा..!**
**–मुख्य संपादक**

# आरबीआयची घोषणा, १०० आणि २०० रुपयांच्या नव्या नोटा आणणार



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारताची मध्यवर्ती बँक म्हणजेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्य गव्हर्नर म्हणून सजय म्हलोत्रा यांनी कार्यभार स्वीकारला आहे. त्यांच्यापूर्वी शक्तिकांत दास हे हे मुख्य गव्हर्नर होते. आरबीआयनं १०० आणि २०० रुपयांच्या नव्या नोटा छापण्याचा निर्णय घेतला आहे. या नोटा लवकरच जारी केल्या जाणार आहेत. मात्र, याच्या डिझाईनमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

आरबीआयनं दिलेल्या माहितीनुसार नव्या नोटांवर गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांची सही असेल. ही एक नियमित प्रक्रिया आहे, ज्यामध्ये नव्या गव्हर्नरची नियुक्ती झाल्यानंतर त्यांची सही असलेल्या नोटा जारी केल्या जातात. आरबीआयनं दिलेल्या माहितीनुसार नव्या नोटांप्रमाणं जुन्या नोटा देखील वैध असतील. आरबीआयनं दिलेल्या माहितीनुसार या नोटा लवकरच बँका आणि एटीएममध्ये उपलब्ध असतील.

आरबीआयनं २००० हजार रुपयांच्या नो बंद केल्यानंतर बाजारातील रोकड वाढली आहे. आरबीआयच्या आकडेवारीनुसार मार्च २०१७ मध्ये बाजारात १३.३५ लाख कोटींची रोकड होती. तर, मार्च २०२४ पर्यंत याची वाढ ३५.१५ लाख कोटी झाली आहे. मार्च २०२० पर्यंत यूपीआय व्यवहारांची संख्या २.०६ लाक कोटी होती. जी फेब्रुवारी २०२४ पर्यंत १८.०७ लाख कोटी झाली. २०२४ चा विचार केला तर वर्षभरात डिजीटल व्यवहारांची संख्या १७२ अब्ज इतकी होती.

रिपोर्टनुसार दिल्ली, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि कर्नाटकमध्ये चालू आर्थिक वर्षात सर्वाधिक रक्कम एटीएममधून काढली गेली. तर, सण आणि निवडणुकीच्या काळात रोख रकमेची मागणी वाढल्याचं दिसून आलं. ग्रामीण भागात डिजीटल पेमेंटची सेवा मर्यादित आहे. यामुळं लोक रोख रकमेचा वापर व्यवहारासाठी करतात.

दरम्यान शक्तिकांत दास यांच्या जागी मुख्य गव्हर्नर म्हणून निवड झाल्यानंतर संजय म्हलोत्रा यांनी पहिल्याच तिमाहीत रेपो रेट घटवला होता. शक्तिकांत दास यांची त्यानंतर पीएमओमध्ये नियुक्त करण्यात आली.

# रंगाचा बेरंग कराल तर खबरदार –अबिनाश कुमार



**नांदेड (प्रतिनिधी)–** होळी व धुलिवंदन यादरम्यान मद्यप्राशन करून वाहने चालविणाऱ्या वाहनधारकांवर पोलिसांची करडी नजर आहे. रंगाचा बेरंग कराल, तर याद राखा असा सज्जड इशारा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी शांतता भंग करणाऱ्या युवकांना दिला आहे.

दि. १३ मार्च रोजी होळी व दि. १४ मार्च रोजी धुलिवंदन हा सण मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येणार आहे. शहर व जिल्ह्यात काही अनुचित प्रकार घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून सर्व वाहनधारकांनी मद्य प्राशन करुन वाहन चालवू नये. विना वाहन परवाना (लायसंन्स), ट्रिपल सिट बसवून वाहने चालवू नये, तसेच रॅश ड्रायव्हिंग करु नये, जेणे करुन अपघात होईल. तसेच रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्या वाहनांवर कलरने भरलेले फुगे फेकून मारु नये किंवा रंग टाकु नये. धुलिवंदन साजरा करताना विना वाहन परवाना (लायसंन्स), ट्रिपल सिट बसवून, वाहनांमध्ये बदल करुन (फटाका) आवाज करत, रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांवर फुगे फेकुन मारल्याचे किंवा रंग टाकल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच ड्रंक अॅन्ड ड्राइव्हच्या केसेस करण्यात येतील, त्यामुळे सण साजरा करताना दक्षता घ्यावी असे सांगण्यात आले.

# हलाल आणि झटका मटणावरुन राजकारण तापलं

## मल्हार सर्टिफिकेशनवरून मार्तंड संस्थांच्या विश्वस्तांमध्येही मतभेद

**मुंबई (प्रतिनिधी)–** भाजप नेते आणि मंत्री नितेश राणेंच्या वक्तव्याने राज्याच्या राजकारणात नवा वाद निर्माण झाला आहे. आता मटण दुकानांना मल्हार सर्टिफिकेट देण्याचा निर्धार मात्सोद्योग आणि बंदरेविकास मंत्री नितेश राणे यांनी केला आहे. मात्र नितेश राणे यांनी घेऊ इच्छित असलेल्या निर्णयाला आता जेजुरीच्या मार्तंड देवस्थानमध्ये मतभेद दिसून येत आहेत.

भाजप आमदार आणि मत्स्योद्योग आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी मटण दुकानांना मल्हार सर्टिफिकेट देण्याचा निर्धार केला आहे. आता मल्हार सर्टिफिकेशन डॉट कॉमच्या माध्यमातून फक्त हिंदू समाजातील खाटीकांना हे सर्टिफिकेट मिळणार आहे. मात्र, या योजनेचे नाव त्वरीत बदलावे, अशी विनंती जेजुरी देवस्थानचे विश्वस्त डॉ. राजेंद्र खेडेकर यांनी मंत्री नितेश राणे यांना केली आहे. श्री मल्हार म्हणजे खंडोबा हे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत आहे. ही देवता पूर्णपणे शाकाहारी आहे. त्यामुळे या योजनेचे नाव बदलण्यात यावे, अशी विनंती जेजुरी देवस्थानच्या विश्वस्तांनी केली आहे. याबाबत त्यांनी नितेश राणेंना एक पत्र देखील पाठवले आहे. तर मार्तंड देवस्थानचे विश्वस्त मंगेश घोणे यांनी या मल्हार सर्टिफिकेटशनचे स्वागत केलेलं आहे आणि जी भूमिका खेडेकर यांनी मांडली ती संपूर्णतः वैयक्तिक असल्याचे मंगेश घोणे यांनी म्हटल आहे.

# शेती वाचवा, देश वाचवा! शक्तिपीठ महामार्गाविरोधात आझाद मैदानात एल्गार; हजारो शेतकरी एकवटले

**मुंबई (प्रतिनिधी)–** कोणतीही मागणी नसताना आणि १२ जिल्ह्यांतील सुपीक जमिनीचा नाश होणार असल्याने अत्यंत वादग्रस्त ठरत चाललेल्या शक्तिपीठ महामार्गाविरोधात बुधवारी आझाद मैदानात हजारो शेतकरी एकवटले आहेत.

शक्तीपीठ महामार्गविरोधातील आंदोलन समर्थन देण्यासाठी महाविकास आघाडीमधील नेते आझाद मैदानामध्ये पोहोचले. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शक्तिपीठ महामार्ग विरोधात स्थगन प्रस्ताव आणणार असल्याचे सांगितले. आझाद मैदानात अंबादास दानवे, आमदार सतेज पाटील आणि जयंत पाटील यांनी संबोधित केले. जयंत पाटील यांनी शक्तीपीठ महामार्गावर बोलताना राजकीय टोलेबाजी करताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांच्यावर राजकीय टोलेबाजी केल्याने चर्चेचा विषय ठरला.

### रस्ता करायचा आहे, मात्र लादायचा नाही –मुख्यमंत्री

शासनाची भूमिका स्पष्ट आहे, शक्तिपीठ महामार्ग हा रस्ता करायचा आहे, मात्र लादायचा नाही. बंटी पाटील आणि मुश्रीफ यांच्यासोबत कोल्हापूर एअरपोर्टला शेतकरी प्रतीक्षा करत होते, तेव्हा शेतकरी या मार्गाला विरोध करत नसून सह्याचं निवेदन त्यांनी दिलं. शक्तीपीठ महामार्ग मराठवाड्याच्या ५ जिल्ह्याचं चित्र बदलणारा आहे. शेतकऱ्यांना हा मार्ग हवा आहे, हा अट्टाहास नाही. समृद्धी महामार्गाने १२ जिल्ह्यातील जीवन बदललं, तसं या महार्गाने देखील जीवन बदलणार आहे. आज जसा मोर्चा आला, त्याच्या तिप्पट कार्यक्रम हा मार्ग व्हावा यासाठी होणार आहे. ज्या गावांमध्ये सभा झाल्या, त्या गावात शेतकऱ्यांनी पैसे दिले आहेत. शेतकऱ्यांना जमिनीच्या पाचपट भाव दिला आहे. त्यामध्ये विरोधकांनी देखील मदत करावी, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मांडली.

विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शक्तीपीठवरून बदललेल्या भूमिकेचा समाचार घेताना तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा व्हिडिओ दाखवला. शक्तिपीठ नको असेल तर सरकार तुमच्या मनाविरोधात काम करणार नाही, असे एकनाथ शिंदे म्हणाले होते. तो व्हिडिओ अंबादास दानवे यांनी शेतकऱ्यांना दाखवला. या सरकारचं कंत्राटदारांशी घेणदेणं असल्याचे ते म्हणाले. जनतेच्या भावना चिरडायच्या आहेत. मात्र, या लढ्यामागे आम्ही सगळे खंबीरपणे पाठीशी उभे राहू अशी ग्वाही दानवे यांनी दिली.

# किरकोळ महागाई दर ३.६१ टक्क्यांवर; रिझर्व्ह बँकेस एप्रिलमध्ये व्याजदर कपातीस वाव

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भाज्या आणि प्रथिनेयुक्त वस्तूंच्या किमती घटल्यामुळे सरलेल्या फेब्रुवारीमध्ये किरकोळ महागाई दर ३.६१ टक्क्यांपर्यंत नरमला असून, रिझर्व्ह बँकेच्या अपेक्षेप्रमाणे सहनशील पातळीपर्यंत ही नरमाई येत्या एप्रिलमध्ये व्याज दरात दुसऱ्या कपातीस पूरक ठरेल, अशी आशा आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाई दर सरलेल्या फेब्रुवारीत सात महिन्यांच्या नीचांकी पातळीवर दिलासादायी घसरण झाली आहे. या आधी जानेवारीत तो ४.२६ टक्के, तर गेल्या वर्षी फेब्रुवारी २०२४ मध्ये ५.०९ टक्के पातळीवर होता. फेब्रुवारी २०२५ मध्ये वार्षिक सरासरी चलनवाढीचा दर ३.७५ टक्क्यांवर गडगडला आहे.

जानेवारी २०२५ च्या तुलनेत फेब्रुवारी २०२५ मध्ये खाद्यान्न महागाईत २२२ आधारबिंदूंची तीव्र घट दिसून आली आहे. फेब्रुवारीमधील खाद्यान्न महागाईची पातळी ही मे २०२३ नंतरची सर्वात कमी पातळीवर आहे. फेब्रुवारीत प्रमुख चलनवाढ (कोअर इन्फ्लेशन) आणि अन्नधान्याच्या महागाईत लक्षणीय घट झाल्याचे राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने म्हटले आहे.

भाज्या तसेच प्रथिनेयुक्त आहार असलेल्या अंडी, मांस आणि मासे, डाळी आणि उत्पादने, दूध आणि उत्पादनांच्या महागाईत घट झाल्यामुळे महागाईत तीव्र घसरण झाली आहे. किरकोळ महागाईदर ४ टक्क्यांच्या पातळीवर मर्यादित ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक प्रयत्नशील आहे. गेल्या महिन्यात महागाईच्या आघाडीवरील चिंता कमी झाल्या कारणाने तिने अल्पकालीन कर्ज दर (रेपो) २५ आधारबिंदूंनी कमी केला आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# राजकारणातील गुन्हेगारीकरण : समस्या आणि उपाययोजना

भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही असलेला देश आहे. परंतु इथे राजकारणात गुन्हेगारीकरण हा एक गंभीर विषय ठरला आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या नेत्यांचे लोकप्रतिनिधी म्हणून निवडले जाणे लोकशाहीसाठी घातक ठरू शकते. सध्या सर्वोच्च न्यायालय अशा नेत्यांना आजीवन निवडणूक लढविण्यावर बंदी घालण्याच्या याचिकेवर विचार करत आहे. मात्र, केंद्र सरकारने असा युक्तिवाद केला आहे की, अशा बंदीमुळे गुन्हेगारांसाठी कठोर शिक्षा ठरणार असून, त्यांच्या सुधारणेच्या संधी नष्ट होतील. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, निवडणुकीवर बंदी घालण्याचा निर्णय फक्त निवडणूक आयोगाचा अधिकार आहे, न्यायपालिकेचा नाही. तर सर्वोच्च न्यायालयाने असा मुद्दा मांडला आहे की, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या लोकप्रतिनिधींना संसद किंवा विधानसभा प्रवेश मिळाल्यास कायदे तयार करताना त्यांचा हितसंबंध बाधित होऊ शकतो. परिणामी, अशा व्यक्तींना निवडणुकीपासून दूर ठेवण्यासाठी कठोर निर्णय घेणे गरजेचे आहे. न्यायालयाने दोषी ठरविलेल्या गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींना राजकारणात संधी देण्यासंबंधीचा हा मुद्दा केवळ कायदेशीर दृष्टीने पाहिला जाऊ नये, तर तो नैतिक दृष्टीनेही तपासला जावा. लोकप्रतिनिधींना उच्च नैतिक मूल्ये आणि जबाबदारी पाळण्याची अपेक्षा असते. जर एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याला गंभीर गुन्ह्यांसाठी दोषी आढळल्यास त्याला सेवेतून बडतर्फ केले जाऊ शकते, तर मग राजकारण्यांसाठी वेगळे नियम का असावेत? राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभाग आणि निवडणूक विश्लेषण अहवालानुसार, भारतीय संसद आणि विधानसभांमध्ये मोठ्या प्रमाणात अशा नेत्यांची संख्या आहे, ज्यांच्यावर गंभीर गुन्ह्यांचे आरोप आहेत. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स या संस्थेच्या अहवालानुसार, सध्याच्या लोकसभेतील जवळपास ४३% खासदारांवर गुन्हेगारी प्रकरणे आहेत, आणि त्यातील काहींवर हत्या, बलात्कार, अपहरण, भ्रष्टाचार यांसारखे गंभीर आरोप आहेत आणि ते न्यायालयात सिद्धही झालेले आहेत. हे आकडे पाहता, स्पष्ट होते की, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना राजकीय प्रवेश मिळत राहिल्यास लोकशाही व्यवस्थेचे मोठे नुकसान होऊ शकते किंबहुना लोकशाही नष्ट होऊ शकते. अशा परिस्थितीत प्रशासनाची पारदर्शकता आणि निष्पक्षता धोक्यात येते आणि जनतेचा लोकशाही संस्थांवरील विश्वास कमी होतो. लोकशाहीचे गुन्हेगारीकरण थांबवण्यासाठी उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. सर्वप्रथम संसदेत आणि विधानसभेत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या नेत्यांचा प्रवेश रोखण्यासाठी कठोर कायदे करण्याची गरज निर्माण झाली आहे. तसेच राजकीय पक्षांनी उमेदवार निवडताना त्यांच्या पार्श्वभूमीची तपासणी करावी आणि न्याय सिद्ध गुन्हेगारी इतिहास असलेल्या लोकांना तिकीट देऊ नये. मतदारांनी त्यांच्या प्रतिनिधींची पार्श्वभूमी जाणून घेऊन सुशासनासाठी सुयोग्य उमेदवारांना मतदान करावे. ही सर्वात प्रभावी उपाययोजना आहे, पण यासाठी मतदारांनी एकजूट होणे गरजेचे आहे. न्यायसंस्थेने अशा गुन्हेगारांना राजकीय लाभ मिळू नयेत, यासाठी प्रभावी निर्णय घ्यावेत. न्यायालयाने त्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. भारतीय लोकशाहीला सशक्त आणि पारदर्शक बनवायचे असेल, तर गुन्हेगारांना राजकारणातून हद्दपार करणे अत्यावश्यक आहे. या संदर्भात केंद्र सरकार, न्यायपालिका, राजकीय पक्ष आणि सामान्य नागरिक यांची संयुक्त जबाबदारी आहे. जर कठोर कायदे आणि लोकशाही जागरूकता वाढवली गेली, तर भविष्यात स्वच्छ आणि गुन्हेगारीमुक्त राजकारणाची संधी निर्माण होऊ शकते अन्यथा आपल्याला आपली लोकशाही व्यवस्था विसरावी लागेल.

# वाईट विचारांना होळीत जाळा, सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करा!



होळी हा आपल्या संस्कृतीतील एक मोठा आणि महत्वाचा सण आहे. भारतातील वेगवेगळ्या भागात फाल्गुन पौर्णिमेला हा सण विविध नावांनी साजरा केला जातो. हा सण होळी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोलायात्रा, कामदहन अशा विविध नावांनी साजरा केला जातो.

होळीच्या दिवशी आपण आपल्या मनातील वाईट विचारांना होळीप्रमाने आगीत जाळून राख करावे अशी कल्पना आहे. त्यामुळे आपले मन निर्मळ व्हावे अशी अपेक्षा असते. आपल्या मनातील वाईट विचारांना होळी प्रमाणे आगीत जाळून सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा संकल्प करण्याचा हा दिवस.

महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. कोकणात तर हा सण अधिक मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलीवंदनाचा सण साजरा केला जातो. याला धुळवड असेही म्हणतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी अग्नीत गव्हाच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील एक कारण असू शकते.

नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याची प्रथा आहे. या दिवशी एकमेकांना गुलाल लावून रंगाची उधळण करणे. सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकता जपणे हा याचा उद्देश. बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. या दिवशी लोक आपसातील भेदभाव भांडण विसरून एकत्र येतात मात्र गेल्या काही वर्षात या सणामध्ये शिरलेल्या अपप्रवृत्तीमुळे या सणाचे पावित्र्य लोप पावले आहे. होळीचा सण साजरा करताना धांगडधिंगा घातला जातो.

धुलीवंदनाच्या दिवशी तर एकमेकांना गुलाल लावण्याऐवजी रसायन मिश्रित रंग लावले जातात. पाण्याचा अपव्यय केला जातो. काही समाज कंटक पाण्याने, रंगाने भरलेले फुगे, पिशव्या रेल्वे गाड्या, बसगाड्यावर तसेच रस्त्यावर फेकून मरतात. त्यात अनेकजण जखमी होतात. अशा घटनांत यापूर्वी काहींना आपले डोळे गमवावे लागले आहेत तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. काही महाभाग तर जाणीवपूर्वक महिलांना टार्गेट करतात. काहीजण रंगाऐवजी नासकी अंडी फेकून मारतात. काहीजण तर या दिवशी लाऊस्पिकरवर मोठ्या आवाजात गाणी लावून हिडीस नृत्य करतात.

धुलीवंदनच्या दिवशी मद्यपान करण्याची नवीनच फॅशन निर्माण झाली आहे. मद्यपान करून नृत्य करताना बऱ्याचदा वाद होतो. हा वाद विकोपाला गेला तर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. वास्तविक होळी आणि धुलीवंदन हे अतिशय पवित्र सण आहेत. मात्र या अपप्रवृत्तीमुळे या सणाला गालबोट लागत आहे. ही अपप्रवृत्ती दूर करून सर्वांनी होळीचा सण साजरा करावा. जे समाज कंटक या पवित्र सणाला गालबोट लावतील त्यांना पोलिसांनी कडक शासन करावे.

–श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# विकलांग आणि त्यांच्या समस्या

आज आपण पाहतो की, रस्त्यारस्त्यावर वा मंदिर परिसरात आपल्याला काही लोकं भीक मागताना दिसतात. त्यात वयोवृद्ध व काही विकलांग लोकं असतात. विकलांग याचा अर्थ मतीमंद (वेडसर), आंधळे, अपंग (लंगडे), मुके, बहिरे. का त्यांचं विकलांग असणं हा शाप आहे काय? यावर लिहिलेला एक विशेष लेख.



विकलांग बाळ. विकलांग या गटात अनेक प्रकार मोडतात. ज्यांना बरोबर बोलता येत नाही. म्हणजेच ज्यांच्यात वाचा दोष आहे. ज्यांना बरोबर ऐकता येत नाही. म्हणजेच कर्णदोष आहे. ज्यांना बरोबर डोळ्यांना दिसत नाही. दृष्टिदोष आहेत. ज्यांना बरोबर चालता येत नाही. म्हणजेच जे अस्थीव्यंग आहेत. तसंच ज्यांची बरोबर बुद्धी विकसित नाही. ते मतीमंद. मतीमंद असणं हा एक अभिशापच मानवी जीवनाला लागलेला आहे. मतीमंद बाळ होणं हा काय जन्म घेणाऱ्या बाळाचा गुन्हा असतो काय किंवा विकलांग बाळ जन्माला येणं हा तरी त्या बाळाचा गुन्हा असतो काय? तर याचं उत्तर नाही असंच आहे. मतीमंद बाळ निपजणं हा बाळाचा गुन्हा नाही वा विकलांग बाळ जन्माला येणं हाही बाळाचा गुन्हा नाही.

मतीमंद बाळ याचा अर्थ असा की, ते असे बाळ की ज्या बाळाचे सर्व अवयव हे सक्षम असतात. त्यांना बरोबर ऐकायला येतं. बरोबर पाहता येतं. मात्र बुद्धी तेवढी सक्षम नसते, असे बाळ. विकलांग या प्रकारात हे सर्व दोष मोडत असतात. तसंच हे दोष कोणत्याही व्यक्तीला असू नयेत. कारण असे दोष ज्या व्यक्तीमध्ये असतात त्या लोकांवर त्यांचा मुळातच दोष नसतांनाही दोषारोपन केलं जातं. कोणी तर त्यांना मागील जन्माच्या पापाचा परिणाम मानतात. म्हणतात की, मागील जन्मात पाप केलं असेल, म्हणून हा असला जन्म मिळाला.

हे सर्वच दोष वाईटच. हे दोष कोणात असू नयेत. परंतु त्याहीपेक्षा सर्वात वाईट दोष मतीमंद असणं. कारण आंधळा, मुका, बहिरा, अस्थीव्यंग या सर्व प्रकारात सर्वच व्यक्तींचा मेंदू शाबूत असतो. त्यामुळं अशा व्यक्तीला घर परिवारानं कुठंही नेवून सोडून दिल्यास तो व्यक्ती परत आपल्या घरी येवू शकतो किंवा ज्यांनी कोणी त्याला जिथं सोडून दिलं त्याला तो पोलिसात तक्रार देवून धडा शिकवू शकतो. परंतु मतीमंद या प्रकारात त्या व्यक्तीचा मेंदूच शाबूत नसतो. त्यामुळं त्याला कोणीही कुठंही सोडून दिलं तर तो व्यक्ती ज्या व्यक्तीनं सोडून दिलं, त्याची पोलिसात तक्रार दाखल करून त्याला धडा शिकवू शकत नाही वा तो व्यक्ती परत आपल्या घरी येवू शकत नाही.

मतीमंद या प्रकाराला पर्यायानं सांगायचं झाल्यास वेडसर व्यक्ती म्हणता येईल. वेडेपणा हा व्यक्तीच्या अंगात कधी जन्मापासूनच असतो. म्हणजेच काही व्यक्ती जन्मापासूनच वेड्या असतात तर काही व्यक्ती या जीवनाच्या कोणत्याही वयात वेड्या होवू शकतात. त्या वेडेपणाला वेळ व काळ लागत नाही. बाकी दोषाचं मात्र असं नाही. क्वचितच प्रसंगी तसे दोष उद्भवू शकतात. शारीरिक विकलांगता हा काही दोष. या दोषावर लोकं दोषारोपण करतात. तसंच त्या विकलांगपणाला शाप समजतात. त्यामुळंच बरीचशी पालक मंडळी अशा व्यक्तींकडून जबरदस्तीनं भीक मागून घेतात. कधीकधी त्या व्यक्तींचे मायबाप जिवंत असतात. तेव्हापर्यंत बरं असतं. त्यानंतर अशा विकलांग व्यक्तींचे हालहाल करुन टाकतात काही नातेवाईक.

विकलांग व्यक्तीचा जन्म घेताना कोणताही गुन्हा नसतो ना त्यांचं कोणतं पाप असतं. जर असे लोकं जन्मापासूनच विकलांग असले तर त्यांचा जन्म हा जनुकीय बदलातून झालेला असतो. परंतु जन्माच्या वेळी जे धडधाकट असतात. परंतु जे जन्मानंतर विकलांग होतात, त्यांचं विकलांग होणं हे त्यांच्यावर त्यानंतर आलेल्या संकटाचा परिपाक असतो. ते संकट जेवढं तीव्र, तेवढी विकलांगता तीव्र.

अलीकडे विकलांगता हा एक अभिशापच ठरलेला आहे. कारण या प्रकारात ग्रासीत असलेल्या लोकांना समाज खूप छळत आहे. त्यांचं जगणं समाजानं असह्य करुन टाकलेलं आहे. त्यांना केवळ नावबोटंच ठेवत नाहीत लोकं तर त्यांना भीक मागायला मजबूर करीत असतात. तसंच अतिशय मेहनतीची कामंही करुन घेत असतात. याही पुढे जावून काही काही मंडळी अशा विकलांग लोकांना दूर असलेल्या मंदिर परीसरात नेतात व त्यांना काही बहाणे सांगून तेथून पळ काढत असतात. त्यानंतर यात काही काही लोकं घरी परत न येता तिथंच स्थिरावतात. कसंतरी जगावं म्हणून फुटपाथवर भीक मागून जगतात. काही मात्र सज्ञान असल्यानं परत येतात. परंतु जे विकलांगतेच्या प्रकारानुसार मतीमंद असतात ते मात्र आपल्या घरी परतच येवू शकत नाहीत. कारण त्यांना तेवढी बुद्धी नसते. ते तिथंच असलेल्या मंदिराच्या पायरीवर बसून राहतात. त्यातच भूक ही माणसाची मोठी गरज असल्यानं त्याच मंदिराच्या पायरीवर बसून भीक मागतात. त्यांना आपल्या प्रारब्धावर रडणंही जमत नाही.

अलीकडील काळात विकलांगता शाप जरी असला, तरी काही काही लोकांना तो शाप वाटत नाही. आजचा काळ पाहता मंदिर परिसरात एक अशीही टोळी सक्रीय झाली आहे की, मानवतस्करी करीत आहे. यात महिलांचीच तस्करी होत आहे. हे एका प्रसिद्ध दैनिकानं म्हटलं. परंतु त्यावरुनच सांगायचं झाल्यास या मानवतस्करीत विकलांग लोकांचाही समावेश नसेल कशावरुन? त्यांचीही तस्करी होत असेलच ही शक्यता नाकारता येत नाही. जी मंडळी या मंदिर परिसरात फिरत असतात. त्यांचा कोणी वाली नसल्यानं त्यांची मानवी तस्करी होतच असावी. परंतु त्यांचा कोणीच वाली नसल्यानं त्यांचं काही वर्तमानपत्रात नामोल्लेख दिसत नाही वा कोणी त्याबद्दल बोलत नाहीत.

महत्वाचं सांगायचं म्हणजे व्यक्ती विकलांग असणं हा गुन्हा आहे काय? तो व्यक्ती विकलांग आहे म्हणून त्याला कुठंही सोडून देणं वा सोडून जाणं हे बरोबर आहे काय? त्या विकलांग व्यक्तीला अर्थपूर्ण जीवन जगण्याचा अधिकार नाही काय? तसाच त्याचा जन्म काही मागील जन्माच्या शापाचा परिणाम आहे काय? या सर्वांची उत्तरं नाही अशीच आहेत. परंतु ते कोण समजून घेणार. कारण आज लोकांकडे वेळच उरलेला नाही कुणाच्या भावभावना समजून घ्यायला. जिथं आपल्याला जन्म देणाऱ्या मायबापाचीच आपण सेवा करु शकत नाही तिथं हे विकलांग. मग त्यांची सेवा आपण का करणार? आपण फक्त एवढंच करु शकतो की, ते दिसले तर त्यांना एकदोन रुपये देवून मोकळे होणे.

महत्वाचं म्हणजे ते विकलांग आहेत हा काही त्यांचा गुन्हा नाही. ते विकलांग आहेत हा त्यांच्या मागील जन्मातील पापपुण्याचा लेखाजोखा नाही आणि ते विकलांग आहेत, म्हणून आपल्यालाही त्यांचा फायदा घेण्याचा अधिकार नाही. आपण एक मानव म्हणून त्यांच्या भावना समजून घ्याव्यात. जगू द्यावं स्वाभिमानानं. हवं तर सरकारनं त्यांच्यासाठी शेल्टर होम काढावेत नव्हे तर त्यांची कोणी छेड काढणार नाही याकडे विशेष लक्ष असावं, सरकारचं आणि आपलंही. त्यातच कोणी त्यांची मानवतस्करी करणार नाही याकडेही सरकारनं, आपण व प्रशासनानं बारकाईनं ध्यान देण्याची गरज आहे. त्यांनाही स्वाभीमानानं जीवन जगता येईल व स्वातंत्र्याचा पुरेपूर उपभोग घेता येईल यात शंका नाही. जेणेकरुन त्यांनाही वाटावं की, भारत माझा देश आहे व सारे भारतीय माझे बांधव आहेत.

–अंकुश शिंगाडे
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# आत्मिक बळ एक जीवनमंत्र

स्वामी विवेकानंद आपल्या मित्रांशी मुक्त चर्चा करतांना म्हणाले,गुरूदेव रामकृष्णाचे चरित्र लोकांना कळाले पाहिजे.लोकांमधील संकुचित,स्वार्थी वृती नाहीशी झाल्यावर प्रत्येक संकटावर मात करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी येईल.लोकांना रामकृष्णाच्या चरित्रातून जे आत्मिक बळ मिळेल त्यातून त्यांच्या प्रश्नाची उत्तरे त्यांना मिळतील.केवळ व्याख्याने ऐकूण काहीच होणार नाही. व्याख्यान ऐकूण लोक टाळ्या वाजवतात आणि माना डोलवतात.खूपच छान! असे म्हणून जेवणासोबत विचार पचवून साफ करण्याचे सामर्थ्य आपल्या भारतीय बांधवात प्रचंड आहे.परीणामस्वरूप कृतिशून्य जीवन जगण्यात धन्यता मानणाऱ्या आमच्या बांधवात जोपर्यंत आध्यात्मिक विचार व विवेकवाद रुजणार नाही.तो पर्यंत केवळ व्याख्याणाने काहीच साध्य होणार नाही.हे प्रखर वास्तव मांडणारे विवेकानंद केवळ आपल्या मित्रांची वैचारीक उंची वाढवितात असे नव्हे तर समस्त युवापिढीला एक जीवनमंत्र देतात.



भारतीय माणसाच्या प्रवृतीचे अचूक वर्णन करुन त्यावर प्रहार करण्याचे काम त्यांनी खुपच मार्मिकपणे केले.गंजलेल्या लोखंडावर कितिही प्रहार केले तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही.त्याला अगोदर विस्तवात टाकुन लाल होईपर्यंत तापविले पाहिजे.त्यानंतर त्याला हवा तसा आकार देणे शक्य होते.संस्काराचेही असेच आहे.केवळ हवेत विरून जाणारे विचार मांडून काहीच उपयोग नाही.युवा शक्तीचे हृदयपरिवर्तन त्यांना खूप महत्वाचे वाटत होते.त्यामुळे समर्पित जीवन जगणाऱ्या तरूणांच्या जीवनाला आकार देणे,त्यांना संस्कार देणे शक्य झाले की त्यांच्यात राष्ट्रभक्ती निर्माण करणे कठिण नाही.विधायक कार्यकर्त्याची मानसिकताच अपेक्षित फलप्राप्ती मिळवून देऊ शकते.त्याचे सकारात्मक परिणाम समाज, राष्ट्र आणि समस्त मानवी जीवनाला प्राप्त होतील. देशबांधवांना खरा धर्म,राष्ट्रप्रेम आणि जिवसृष्टीवरील प्रेम निर्माण करण्यासाठी मनुष्य शक्ती कार्यरत करणे हे आध्यात्माचे खरे कार्य.त्या साठी रामकृष्णाचे चरित्र लोकांना कळाले पाहिजे. आम्ही खूप सात्विकआहोत या गैरसमजातून निर्माण झालेला अंहकार आपल्या सर्वस्वाचा विनाश करतो. आपल्यातील लढाऊ वृती नष्ट करतो.आपल्यातील पतणाची जाणिव होत नाही. आत्मरिक्षणाचे महत्व समजत नाही.त्यामुळे सात्विकतेची भाषा फक्त आम च्या वाणीकक्षेत मर्यादित असते. त्यामुळे उक्ती व कृतीत महद्अंतर असते. क्षुद्र स्वार्थापायी समतोल गमावणारे बांधव अगणित दिसतात.कर्तुत्वशून्य जीवन जगून अखंड हरीनाम जपण्यात तरी काय अर्थ? सदाचारी पुतळ्यासमोर त्याच्या भगीनीवर होणारा अन्याय तो फक्त उघड्या डोळ्यानी पाहुनही प्रतिकार करण्याचे धारिष्ट गमाऊन बसला असेल, तर त्याची सात्विकता काय कामाची?षंडाच्या सात्विकतेला व सहिष्णूतेला अर्थ नसतो.

भूक शमवण्यापुरते अन्न ज्या देशात मिळत नाही,तिथे लोक धर्मपालन कसे करणार?लोकांच्या मूलभूत गरजा एकदा पूर्ण होऊ लागल्या की त्यांच्या मध्ये धर्माभिमान रूजविता येईल.शिवाय आपल्या बांधवांची मनोवृती खूप विचित्र आहे.एखादा गोरा विदेशी येऊन जर आम्हाला आमच्या धर्माविषयी सांगू लागला तर आम्ही खूप हुरळून जातो,पण आमचा एखादा फाटका सन्यासी त्याच्यापेक्षा खूप अभ्यास पूर्ण आणि अतिशय तळमळीने सांगत असेल तरी त्याचा शब्दाला आम्ही मान देतो का?अशी उदा. देऊन आपल्या गुलाम मानसिकतेवर आत्मपरिक्षण करायला ते भाग पाडत.ते अतिशय आत्मविश्वासाने एक गोष्ट सांगत. जेंव्हा माझे अनेक पाश्चात्य शिष्य त्यांच्या ज्ञानासोबत आपले आध्यात्मिक ज्ञान घेऊन भारतात येतील आणि येथील लोकांना सांगतील, तुमचा धर्म,त्यातील ज्ञान,तुमचे शिष्टाचार तुमच्या तील नितिमत्ता या सर्व बाबींना तुम्ही कमी का समजता?आम्ही तुमचा धर्म श्रैष्ठ समजतो. जेंव्हा ते असे आपल्याला सांगतील,तेंव्हा आपल्या देशातील प्रतिष्ठित,गर्भश्रीमंत लोक निमूटपणे ऐकतील आणि खरे ज्ञान ग्रहण करण्याचा सर्वसामान्याचा मार्ग खुला होईल.भगिनी निवेदिता आणि अन्य शिष्यांच्या माध्मातून ते काम करून घेण्याची सुरूवात त्यांनी केली होती.तेआपल्या देशात येऊन आपल्या धर्माचार्यांच्या जागा घेतील.अशी शंका घेण्याचे मुळीच कारण नाही याची स्वामीजी खात्री देतं.

पाश्चात्य लोक अनेक बाबतीत आपला तिरस्कार करतात,याची कबुली देऊन स्वामीजी म्हणतात, आपल्या देशात अनेक वर्षापासून सवर्णानी दलित, आदिवासी लोकावर अन्याय कैला.त्यांना अक्षरश: पायाखाली तुडविले.माणूस म्हणून जगण्याचा त्यांचा अधिकार नाकारला.त्यामुळे पाश्चात्यांना नावे ठेवण्याचा आम्हाला अधिकार आहे का?त्यांच्यापेक्षा आम्ही आमच्या बांधवावर खूप अन्याय केला आहे. आमची जाती व वर्णव्यवस्था पाश्चात्याकडून आमच्यावर होणाऱ्या अन्यायापेक्षा अधिक अन्यायी आहे.या गुलामगिरीमुळे आमच्या देशबांधवाची एक कायम स्वरूपी मानसिकता बनलीआहे.त्या मानसिकतेत लाचारी इतकी घट्ट बसली आहे की भारतीय माणूस त्यामुळे आत्मभान विसरला आहे.स्वामीजी म्हणतात,गोऱ्या अधिकाऱ्याकडे नोकरी मागणारा भारतीय अर्ज लिहतो.हुजूर साहेबास विनंती की माझ्या घरी मला खायला मिळत नाही.माझी बायको व मुले भुकेने तडफडत आहेत.साहेब मी नम्र भावाने विनंती करतो की आपण माझी व माझ्या कुटुंबाच्या उदरभरणाची काहीतरी सोय लावून द्यावी. अन्यथा आमच्यावर भुकेने मरण्याची पाळी येईल.लेखी स्वरूपात आमच्या देशातील युवक आपली लाचारी या शब्दात कबुल करतात.या त्यांच्या विचारांचा आणि स्वाभिमानाचा काही संबध असू शकतो का?

संघटना स्थापून सभा घेणे,नोकऱ्या मागत राहणे. दुष्काळापासून वाचविण्यासाठी ओरडत राहणे. सारखा द्या..द्या..चा आमचा नारा कधी संपणार? असे सारखे मागून कीती मिळणार? भिक मागत बसण्यापेक्षा स्वातंत्र मिळवून घेण्यासाठी आक्रमक व्हा.इंग्रजांच्या राजवटीत आलेल्या सुधारणांचे स्वागतही करा.त्या धोरणामुळे आपल्याला नेमके काय मिळाले यावर चिंतन करा. जो लोकशाहीवादी विचार त्यांनी आम्हाला दिला आहे.त्यामुळे येथील समस्त मानव सुखी होणार आहे,हे नाकबूल करता येणार नाही.आपल्या जवळ त्यांना देण्यासारखे एक असिम भांडार आहे.ते म्हणजे आपले आध्यात्म. मानवतेचा उच्च आदर्श भारतातून निर्माण झाला. वेदांताचे ज्ञान मिळविण्यासाठी आणि आपल्या सना तन धर्मातील गहन आंतरज्ञान शोधण्यासाठी इंग्रज भारतात आले आहेत. तुम्ही ही अमूल्य रत्ने त्यांना द्या.स्वामीजींच्या क्रांतीकारी विचाराला सनातन्यांनी प्रखर विरोध केला.त्यांचा विचार विवेकी युवकांनी मुळीच करू नये.ज्यांनी आपल्या देशातील चातुवर्णा ची भिंत जाणिवपूर्वक जोपासली.सामाजिक विषम तेची बिजं जणिवपूर्वक जोपासले, वाढवीले.मन्मनात उच्चनिचतेची भावना निर्माण केली.पिढ्यांनपिढ्या ती जीवंत ठेवली.त्यांना इंग्रजाना नावे ठेवण्याचा अधिकार आहे का? असा खडा सवालही त्यांनी केला होता. तेंव्हा आमचा धर्म व धर्मरक्षण याविषयी आम्ही नव्याने विचार केला पाहिजे.धर्म माणसासाठी आहे. धर्मासाठी माणूस नाही.धर्मातील नितीनियम हे धर्म ज्ञान सांगणाऱ्यासाठी सोयीचे आणि इतरासाठी गैरसोयीचे करण्यावर भर सर्वत्र दिसून येतो.आपले बुद्धीचातुर्य स्वस्वार्थासाठी वापरून इतरांची गैरसोय करणारे धर्मरक्षक सर्वसामान्यांना यामुळेच आपले वाटत नाहीत.त्यामुळे धर्मांतराचे प्रमाण वाढतआहे. सर्वच धर्मांतरे जबरदस्तीने झाली नाहीत. आज धर्म रक्षकांनी आत्मपरीक्षण करून आपली भूमिका बदलणे गरजेचे आहे.अपरिवर्तणीय विचार आम्हाला मानवतावादी विचारापर्यंत नेऊ शकत नाहीत. तो मानवतावादी धर्म वेगवेगळ्या देशातील सुधारणावाद्यांनी समजून सांगितला पहीजे.जे जे या विश्वातील उदात्त आणि उत्तम आहे.ते ते आम्ही स्विकारले पाहीजे.स्वामीजींनी त्यांच्या जगभ्रमंतीचा उद्देश आपल्या विवेचनातून स्पष्ट केला.कुपमंडूक प्रवृतीने आपल्या धर्माचे खूप अधपतन केले आहे. जेवढा आमचा दृष्टीकोन उदात्त तेवढा आमचा धर्म महान.या अनुषंघाने उगवत्या पिढीने अधिक चिंतन शील होणे ही काळाची गरज आहे.

–प्रा. वसंत गिरी
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

## थोडक्यात...

### २२ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** – राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई व नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यातर्फे २२ मार्च रोजी जिल्हा न्यायालय नांदेड व जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालय तसेच नांदेड येथील कौटुंबीक न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीत मोठ्या संख्येने प्रकरणात तडजोड होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्रीमती सुरेखा कोसमकर व न्यायाधीश नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती दलजीत कौर जज यांनी केले आहे.

### १८ वर्षांखालील मुलींना राबविण्यास सक्त मनाई

**नांदेड (प्रतिनिधी)** – जागतिक महिला दिन ८ मार्च महिला दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील आस्थापना प्रमुख व इतर कर्मचाऱ्यांनी आपल्या घरी किंवा कार्यालयात तसेच कार्यालयातर्गंत असणाऱ्या संस्थांमध्ये १८ वर्षाखालील मुलींना घरकाम व इतर कामासाठी प्रवृत्त केले जाऊ नये, तसेच कामावर ठेवण्यात येऊ नये. याबाबत कार्यालय प्रमुखांनी खात्री करावी व तशा पध्दतीने प्रतिज्ञापत्र जिल्हा महिला बाल विकास कार्यालयास सादर करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत. बालकामगार कायदा १९८६, बालकामगार प्रतिबंध आणि नियमन सुधारणा कायदा २०१६ अन्वये बालकांना सर्व प्रकारच्या रोजगारात कामावर ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने करावा -डॉ.अश्विनी जगताप

## 'एमजीएम' संकुलात महिली दिनी व्याख्यान



**नांदेड (प्रतिनिधी)** – दिसण्यापेक्षा असणं महत्वाचं आहे. विद्यार्थ्यांनी वास्तव विसरू नये, मनाची मशागत करावी, मग यश आपोआप येते. तसेच विद्यार्थ्यांनी सोशल मिडीयाचा वापर जबाबदारीने करावा, असा सल्ला उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांनी दिला.

जागतिक महिला दिनानिमित्त 'एमजीएम' अभियांत्रिकी महाविद्यालयात संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या.

या वेळी व्यासपीठावर डॉ. सुलभा दाचावार, डॉ. मंगल बनवसकर, डॉ. अर्चना राजूरकर, डॉ. कल्पना जोंधळे, डॉ.मनीषा जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्रावणी मुळी या विद्यार्थिनीच्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर अभियांत्रिकीच्या ग्रंथालयातर्फे महिलांचे स्वागत करण्यात आले. यावेळी ग्रंथपाल डॉ. गोविंद हंबर्डे यांनी संजय चौधरी यांची 'दागिना', योगिनी सातारकर यांची 'मला जगायचंय', मनोज बोरगावकर यांची 'मी जातच राहीन प्रेतयात्रेला' आणि प्रशांत असनारे यांची 'तीन दिवे' आदी स्त्रीवादी कवितांचे वाचन केले.

उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप पुढे म्हणाल्या की, वाचन आणि विचार हीच विद्यार्थ्यांची मार्कलिस्ट असावी असेही त्या म्हणाल्या. विद्यार्थ्यांनीना त्यांनी अर्धा तास स्वतःला वेळ देण्यासही सांगीतले. दहा मिनिटे पुस्तक वाचन, दहा मिनिटे व्यायाम आणि दहा मिनिटे ध्यानधारणा, या मुळे एक सशक्त व्यक्तिमत्व तयार होण्यास मदत होईल, असे त्या शेवटी म्हणाल्या. इलेक्ट्रॉनिक्स टेलिकम्युनिकेशन विभागातील प्रोफेसर मंगल बनवसकर यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहूण्यांचा ग्रंथ भेट आणि गांधीजींची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला 'एमजीएम' पत्रकारिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश जोशी, ग्रंथालयशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोविंद हंबर्डे तसेच सर्व शिक्षिका आणि विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या योजनांचा लाभ घ्या -शिवानंद मिनगीरे

## चित्ररथातून शासकीय योजनांच्या माहितीला प्रसिद्धी



**नांदेड (प्रतिनिधी)** – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासनाच्यावतीने श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, तसेच डीबीटी पोर्टल आदी योजनांच्या प्रचार प्रसिद्धीसाठी चित्ररथ सुरू करण्यात आला आहे.

विशेष सहाय्य विभागाच्या महत्त्वपूर्ण योजना मार्फत ज्येष्ठ नागरिकांना असहाय्य नागरिक, विधवा महिलांना केंद्र व राज्य शासनामार्फत मदत केली जाते. त्यामुळे या योजनांचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक गावागावात घेतला गेला पाहिजे, असे आवाहन जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त सामाजिक न्याय विभाग शिवानंद मीनगिरे यांनी केले आहे.

या योजनांमधून जवळपास सर्व वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक सहाय्य दिल्या जाते. असाह्य गरीब कुटुंबातील १८ ते ६५ वर्षाखालील पात्र लाभार्थ्यांना या सर्व योजनांमधून दीड हजारापर्यंत मदत केली जाते. या योजनांचा फायदा घ्यावा तसेच या योजनांचा लाभ आपल्या गावातील नागरिकांना मिळावा, यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.

अधिक माहितीसाठी संबंधित तहसील कार्यालय अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# माहूर येथील मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, आरोग्य तपासणी शिबीरात २७४ रुग्णांची तपासणी



**माहूर (प्रतिनिधी)** – खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या मार्गदर्शनाखाली उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ज्योतिबा दादा खराटे यांच्या संकल्पनेतून दि. १० रोजी मोफत नेत्र तपासणी मोती बिंदू शस्त्रक्रिया आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात तब्बल २७४ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

युवासेना जिल्हाप्रमुख यश खराटे यांच्या हस्ते जुन्या नगरपंचायत इमारतीच्या प्रांगणात शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी तालुकाप्रमुख उमेश जाधव, उपनगराध्यक्ष नाना लाड, रविंद्र बेहेरे, शहरप्रमुख निरधारी जाधव, शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख अशोक उप्पलवाड, युवा जिल्हा समन्वयक अक्षय सातव, गटनेत्या सौ.आशा जाधव, शहर समन्वयक बालाजी वाघमारे, युवती सेना तालुकाप्रमुख सौ. सुरेखा तळणकर, युवासेना जिल्हा उपप्रमुख जितु चोले, युवासेना विधानसभा प्रमुख खुशाल तामखाने, युवासेना तालुका प्रमुख अक्षय वाघ, शहरप्रमुख संदिप गोरडे, सो. मि.वि.स.प्रमुख गजानन चव्हाण, युवा शहर उपप्रमुख कनिष्ठ वानखेडे, सोनु तेल्हारे, रमेश कुरसंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

वानोळा येथील शिबिरात १६४ रुग्णांनी तर माहूर येथील शिबिरात २७४ रुग्णांनी लाभ घेतला. दि. ११ रोजी वाईबाजार, १२ रोजी मांडवी तसेच किनवट तालुक्यात दि १९ पर्यंत हे शिबिर सुरू राहणार आहे. गरजूंनी शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन ज्योतिबा खराटे, यश खराटे यांनी केले आहे.

# गणपती मूर्तिकार बांधवांच्या सदैव पाठीशी –आ. हेमंत पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)** – प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीमुळे नदीचे प्रदूषण होत असते. त्यामुळे न्यायालयाने पीओपीला बंदी घातली आहे. गणपती मूर्ती बनविणाऱ्या मुर्तीकारावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यांच्या या न्यायालयीन लढाईत मी शिवसेना पक्ष सदैव त्यांच्या पाठीशी आहे, असा विश्वास कॅबिनेट मंत्री हेमंत पाटील यांनी मूर्तिकार बांधवांच्या बैठकीत व्यक्त केला.



नदीच्या प्रदूषणाला पीओपी जबाबदार असल्यानेच पीओपी पासून बनणाऱ्या मूर्ती व इतर वस्तूंवर न्यायालयाने बंदी आणली आहे. परंतु त्यामुळे लाखो मूर्तिकार कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे.

पीओपीने नदी प्रदूषीत होते, पण इतकी वर्षे यावर अवलंबून असणाऱ्या मूर्तिकार कामगारांनी काय करावे असा सवालही नामदार हेमंत पाटील यांनी उपस्थित केला. या बैठकीला नामदार हेमंत पाटील यांच्यासह उपशहर प्रमुख अवतारसिंग, जेष्ठ शिवसैनिक बिल्लू यादव संघटनेचे अध्यक्ष गजेंद्रसिंह ठाकूर, उपाध्यक्ष शिवराजसिंह परमार, सचिव चंदनसिंह ठाकूर, अवतारसिंघ पहरेदार, ज्येष्ठ शिवसैनिक बिल्लू यादव, दत्तात्रय पेंटर, आनंद पलये, नामदेव झुरुडे, श्रीनिवास परडे, शंकर परडे, अंकुश झुरुडे, गोविंदसिंह गहेरवार, शंकरसिंह परमार यांच्यासह मूर्तिकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना नामदार हेमंत पाटील म्हणाले की, देशाची संस्कृती या ना त्या माध्यमातून कोणी–कोणी जिवंत ठेवत असतात. त्यामध्ये आपल्या मूर्तिकार बांधवांचा वाटा मोलाचा आहे. ते आपल्या कलेच्या माध्यमातून हे काम करत आहेत. अनेक वर्षांपासून ते आपला व्यवसाय करत आहेत आणि अचानक त्यांना पाहिजे असलेल्या कच्च्या मालावर बंदी आणल्यामुळे सर्व मूर्तिकार बांधव हैराण झाले आहेत. व्यवसाय सुरू ठेवल्यास न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होईल या भीतीने सर्व व्यवसाय ठप्प झाले आहेत. आगामी काळात गणपती उत्सव, नवरात्र उत्सव येत असून त्याची तयारी सुद्धा आतापासून करावी लागते. त्याकरिता या समस्येवर खात्री लायक उपाय काढावा अशी मागणी मूर्तिकार बांधवांनी केली आहे. यावर नक्की उपाय काढून मूर्तिकार बांधवांसोबत मी आणि शिवसेना पक्ष सदैव आपल्या सोबत असल्याचा विश्वास या बैठकीत नामदार हेमंत पाटील यांनी व्यक्त केला.

# उ.म.प्रा.वि.फेस्कॉम नांदेडच्यावतीने जागतिक महिला दिन साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– उ. म. प्रा वि. फेस्कॉम नांदेडच्यावतीने महिला दिन विशेष एका आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. सर्व निमंत्रित महिला अतिथींचे यजमान पुरूष मंडळींनी गुलाब पुष्पगुच्छ देऊन टाळ्यांच्या गजरांनी स्वागत केले.



आपला संसाराचा गाडा अत्यंत निटनेटका सांभाळून, वेगवेगळ्या क्षेत्रात आपापल्या कर्तबगारीने उच्च पदांपर्यंत पोहचून कार्यतत्पर असलेल्या तथा नावलौकिक मिळविलेल्या कर्तव्यदक्ष तथा कर्तृत्वान महिला यात विशेषत्वे करून सौ. निर्मला बाऱ्हाळे (आदर्श निवृत शिक्षिका, गृहिणी तथा सामाजिक कार्य), डॉ.ज्योति डोईफोडे (आदर्श निवृत्त प्राध्यापिका, उत्कृष्ट गृहिणी, तथा सामाजिक कार्यकर्त्या), डॉ. अश्विनी जगताप जिल्हा पोलीस उपअधिक्षक (गृह) निष्णात तथा आदर्श प्रशासकीय अधिकारी, सौ.समता तुमवाड (सामाजिक क्षेत्र), सौ.सविता कलटवाड पो. नि. (सायबर गुन्हे शाखा) मुंबई पोलीस, सौ. मंजुषा भोसले मोटार वाहन उपअधिक्षक, डॉ. सौ. ज्योती कदम (पो. नि. पो.ठा. बारड), डॉ. सौ. शिला कदम (शैक्षणिक, वैद्यकीय सेवा, सामाजिक व राजकीय क्षेत्र), सुरेखा पाटणी (सामाजिक क्षेत्र), डॉ. सौ. शितल भालके (शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजीक, राजकीय क्षेत्र), सौ. नंदा गायकवाड (गायक व गायन मार्गदर्शिका), मेघा गायकवाड (संगीत विशारद तथा गायीका) आदी २५ महिलांचा सामावेश होता. सुरुवातीस उद्घाटक डॉ. सौ. अश्विनी जगताप यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. गायिका मेघा गायकवाड यांनी आज 'जिने की तमन्ना है' हे सुंदर गीत गायीले.

मान्यवर निमंत्रीतांचा यथा योग्य सन्मान करण्यात आला. मान्यवरांचे समयसुचक मार्गदर्शन झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रभाकर कुंटूरकर, गिरिष बाऱ्हाळे यांनी परिश्रम घेतले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# येरगी ग्रामपंचायतमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** – महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपल्या कार्यातून कामाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या नुसते महिला सशक्तिकरण म्हणजे केवळ महिलांना मदत करणे नाही तर त्यांना स्वावलंबी बनवणे, त्यांच्यासाठी सुरक्षित आणि समान हक्क असलेला समाज निर्माण करणे हे गरजेचे आहे, असे प्रतिपादन सहशिक्षिका श्रीमती एस. बी. सोनवणे यांनी केले.



ग्रामपंचायत येरगी (ता. देगलूर) येथील ग्रामसभेत जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात महिला समस्या, आरोग्य समस्या, अधिकार, कर्तव्य व हक्क याबाबींवर माहिती देण्यात आली. तसेच महिला प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये, शौचालय, बालविवाह स्वच्छता, हुंडाबंदी, स्त्री भ्रूण हत्या या विषयांवर महिलांन चित्रपट दाखविण्यात आले. या कार्यक्रमासाठी सहायक गट विकास अधिकारी कुरुंदे, विस्तार अधिकारी उमाटे, यशदाचे राजेश वानखेडे, श्रीमती एस.बी. सोनवणे, महिला डॉक्टर तसेच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. यावेळी श्रीमती एस. बी. सोनवणे यांनी जागतिक महिला दिनाचे महत्व विशद केले. तसेच विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांची जीवन कथा सांगितली. विद्यार्थिनींना अभ्यासाचे महत्त्व आणि आई–वडिलांच्या स्वप्नांचा विचार करून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाविषयी सखोल मार्गदर्शन केले. ग्रामपंचायत अधिकारी राजेश तोटावाड यांनी सूत्रसंचालन करून उपस्थितांचे आभारही मानले.

# आमदार बालाजी कल्याणकर यांच्या हस्ते शिवरायनगरात विकासकामांचे भूमिपूजन



**नांदेड (प्रतिनिधी)** – मालेगाव रोड (जिजाऊ पाटी) शिवराय नगर ते शिवराय पार्क, शिवरस्ता महादेवनगर पाटी पर्यंत सी.सी. रस्ता करणे व रस्त्याच्या दोन्ही बाजूला नाली बांधकाम करणे आदी विकासकामांचे आ. बालाजी कल्याणकर यांच्या हस्ते रविवार दि. ९ मार्च रोजी भूमिपूजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधीज्ञ एम. झेड.सिद्दिकी, प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख, मोतीराम मुंडे ज्योती कल्याणकर, सुनंदाताई पाटील, अरविंद देशमुख, एकनाथ कल्याणकर, संजय आंबोरे, धनंजय गव्हाणे, अभियंता संदीप पाटील, धनंजय पावडे, नवनाथ काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आ. कल्याणकर म्हणाले की, आपल्या नगरातील सर्व विकासकामे दर्जेदार होतील यात कोणतीही शंका नाही. भविष्यात ओपन जीम असेल. पोलीस चौकी असेल. यावेळी रस्ते, ड्रेनेज व पाण्याच्या प्रश्नासोबतच या भागातील क्रीडांगणाचा प्रश्न सोडवण्यात यावा अशी मागणी अध्यक्षीय समारोप प्रसंगी ॲड. एम. झेड. सिद्दिकी यांनी केली. यावेळी आ. बालाजी कल्याणकर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. शिवरायनगर वाशीयांच्या वतीने आ.बालाजी कल्याणकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भिमराव कल्याणकर, दिगंबर कल्याणकर, मंगेश शिंदे, ॲड. शाहजान सिद्दिकी, प्रल्हाद आयनेले, आर. आर. येवतीकर, फारूक बेग, गजानन धुमाळ, ओंकार वणवे, सुरेश इंगोले, प्रा. अशोक घोडके, दादाराव नागरगोजे, प्रा. कविता सोनकांबळे, कल्पना घोडके, शिवाजी सगर, राम शिरढोणकर, अय्युब पठाण, अब्बास काजी, दिपक गोडघासे आदी नागरिक उपस्थित होते.

# श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत 'उत्सव २०२५' महोत्सव साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** – श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत आयोजित 'उत्सव २०२५' हा सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या उत्सवात विद्यार्थ्यांनी नृत्य, संगीत, नाटक, काव्यवाचन, कला प्रदर्शने, एकपात्री अभिनय, तसेच विविध मनोरंजनात्मक व सृजनशील स्पर्धेत सहभाग नोंदवला.



७, ८ आणि ९ मार्च दरम्यान पार पडलेल्या या महोत्सवात नृत्य, संगीत, नाटक, काव्यवाचन, कला प्रदर्शने, एकपात्री अभिनय, तसेच विविध मनोरंजनात्मक व सृजनशील स्पर्धा घेण्यात आल्या. यंदाच्या महोत्सवाचे एक विशेष आकर्षण म्हणजे राज्यस्तरीय अंतर – महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा आहे. या स्पर्धेत राज्यभरातून ३५ हून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य संत बाबा सुखविंदर सिंघजी, संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रा. संजय देठे यांच्या हस्ते दि. ७ रोजी सायंकाळी सात वाजता महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

प्रमुख आथिती म्हणून प्रसिद्ध मराठी पार्श्वगायक ऋषिकेश रानडे, सिनेस्टार अकॅडमीचे संचालक दिनेश कवडे उपस्थित होते. तसेच समन्वयक डॉ. वाहिद देशमुख, सह–समन्वयक प्रा.टिलक जाधव, विद्यार्थी समन्वयक सुभम काचावार, जीएस सिध्दी बोरगावकर उपस्थित होते. ऋषिकेश रानडे यांच्या गायनाने उपस्थित विद्यार्थ्यांची मने जिंकली आणि महोत्सवाला रंगत आणली.

या प्रसंगी संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'उत्सव २०२५' या महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळेल. संत बाबा सुखविंदर सिंघजी यांनी महोत्सवाच्या माध्यमातून संस्कृती आणि परंपरेचे जतन करण्याचे महत्त्व सांगितले. प्रा. संजय देठे यांनी संस्थेत भविष्यातही असे उपक्रम अधिक व्यापक प्रमाणात आयोजित केले जातील असे ते म्हणाले.

८ मार्च रोजी राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धा झाल्या. नृत्य, गायन, वाद्यवादन, नाट्य आणि काव्यवाचन यांसारख्या विविध स्पर्धांना विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह आणि रोख बक्षिसे देऊन गौरवण्यात आले.

संध्याकाळी हास्यकवी मिर्झा रफी बेग यांच्या विनोदी सादरीकरणाने कार्यक्रमात एक वेगळीच रंगत आणली. त्यांच्या खास शैलीतील हास्यविनोदाने सर्वांची मने जिंकली.

उत्सव २०२५ चा समारोप ९ मार्च २०२५ रोजी झाला. या वेळी 'वऱ्हाड निघालंय लंडनला' नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. सायंकाळी समारोप सोहळ्यात विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. समन्वयक डॉ. वाहिद देशमुख यांनी आभार मानले. हा महोत्सव विद्यार्थ्यांना नवीन संधी आणि कलेच्या माध्यमातून व्यक्त होण्याचे एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देईल, असा विश्वास डॉ. देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

फॅशन|संसार|सौंदर्य

# सखी

# हेल्मेटमुळे केस गळतात का?



**आजकाल अनेकांना केस गळण्याची समस्या भेडसावत आहे. विशेषतः हेल्मेट घालणाऱ्यांमध्ये केस गळण्याची समस्या सामान्य आहे असे मानले जाते. डोक्याच्या सुरक्षेसाठी वाहन चालवताना हेल्मेट घालणे अनिवार्य आहे. होय, ते महत्त्वाचे आहे. पण त्यामुळे केस गळण्याची समस्या निर्माण होऊ शकते. आज काल ऑफिसला जाण्यापासून बाजारात जाण्यापर्यंत सर्वंच जण बाईक वापरतात. पण आपल्यात एक समज पाहायला मिळतो तो म्हणजे हेल्मेट वापरल्याने केस गळतात. हेअर स्पेशालिस्टनी काही उपाय सांगितले आहेत. त्यांच्या मते हेल्मेट वापरल्यानेच केस गळतात असे आपण बोलू शकत नाही. केस गळण्यासाठी अनेक गोष्टी कारणीभूत असतात. पण सतत हेल्मेट घातल्याने अनेक समस्या होऊ शकतात.**

- केस स्वच्छ ठेवा : हेल्मेट घालताना आतून घाम आल्याने कोंड्याची समस्या उद्भवू शकते. त्यामुळे रोज आंघोळ करावी. केस आणि मुळे स्वच्छ ठेवा. हे केसांमध्ये घाण जाण्यापासून प्रतिबंधित करते, कोरडेपणा दूर करते आणि केस गळणे टाळते.
- ओल्या केसांवर हेल्मेट घालू नका : केस ओले असताना हेल्मेट घातल्याने बॅक्टेरिया वाढण्याची शक्यता वाढते. केसांमध्ये कोंड्याची समस्या निर्माण झाली की केस गळू लागतात. त्यामुळे ओल्या केसांवर हेल्मेट परिधान करू नका. त्यामुळे आंघोळ केल्यानंतर केस चांगले कोरडे करा आणि ते कोरडे झाल्यानंतरच हेल्मेट घाला.
- एक पातळ सुती कापड केसांना लावा आणि हेल्मेट घाला : आपले केस आणि हेल्मेट दरम्यान एक पातळ, सुती कापड ठेवा. असे केल्याने तुमचे केस हेल्मेटच्या आतील बाजूस घर्षण होण्यापासून रोखतील. फॅब्रिक घाम शोषण्यास मदत करते, जे तुमचे केस आणि हेल्मेटच्या अस्तरांचे नुकसान होण्यापासून संरक्षण करते. केस गळण्याची समस्या नाही.
- तेल मालिश करा : केसांच्या कूपांना योग्य पोषक द्रव्ये न मिळाल्यास केस गळू शकतात. त्यामुळे कोमट तेल लावा आणि दोन दिवसातून एकदा तरी डोक्याला मालिश करा. हे रक्ताभिसरण वाढवण्यास आणि केस गळणे कमी करण्यास मदत करते.
- हेल्मेट स्वच्छ ठेवा : आठवड्यातून किंवा दोन आठवड्यातून एकदा हेल्मेट साफ करायला विसरू नका. यामुळे तुमच्या केसांना नुकसान होणार नाही. सर्व चांगल्या दर्जाच्या हेल्मेटच्या आतील बाजूस असलेले कुशनिंग फॅब्रिक काढून टाकले जाऊ शकते आणि धुतले जाऊ शकते. अशा प्रकारे, आपण तेथे जमा झालेली कोणतीही धूळ, घाम आणि बॅक्टेरिया साफ करता. उरलेले स्वच्छ ओल्या कापडाने चांगले पुसून टाका.








# उन्हाळ्यात हवे या ५ फॅब्रिकचे कपडे!

**आपण सूर्य अक्षरशः आग ओकत असल्याच अनुभवत आहोत. अशावेळी कपड्यांमध्ये कोणत्या फॅब्रिकला पसंती द्यावी हा प्रश्न पडतो. वाढतं तापमान आणि उन्हाचा तडाखा यातून थोडा आराम देणाऱ्या कपड्यांची निवड करणे गरजेचे असते. अशाच ५ फॅब्रिकबाबत आज आपण माहिती जाणून घेणार आहोत. महत्त्वाचं म्हणजे या फॅब्रिकमधून नैसर्गिक फिल मिळतो. या कपड्यांच्या निर्मितीकरता निसर्ग जपला जातो.**

## ऑर्ग्रॅनिक कॉटन

कापूस हे कदाचित जगातील सर्वात अष्टपैलू आणि लोकप्रिय फॅब्रिक आहे आणि त्याचे कारण म्हणजे त्यामधून मिळणारा आरामदायी फिल. उष्णतेचा सामना करण्यासाठी कपड्यांकडे देखील विशेष लक्ष द्यायला हवं. सुती कपडे बनवताना अनेक प्रकारे पर्यावरणाची हानी होते. या गैरसोयींमुळे, अलिकडच्या वर्षांत, फॅशन उद्योग पर्यावरणाच्या दृष्टीने अधिक जागरूक झाला आहे आणि पारंपारिक कापसाऐवजी सेंद्रीय कापसाकडे वळला आहे. पारंपरिक कापसाच्या तुलनेत सेंद्रिय कापूस तयार करताना 90% कमी पाणी वापरले जाते, तर कार्बन उत्सर्जन देखील 46% ने कमी होते हे अनेक संशोधनांमध्ये सिद्ध झाले आहे. यामध्ये रासायनिक पदार्थ आणि कीटकनाशकांचा वापर नगण्य आहे. त्यामुळे माती आणि स्थानिक जलस्त्रोतांचेही संरक्षण होते. याशिवाय सेंद्रिय कापूस वजनाने हलका आणि श्वास घेण्यायोग्य आहे, जो तुम्ही पारंपारिक कापसाप्रमाणे वापरू शकता. त्यामुळे ऑर्ग्रॅनिक कॉटनपासून तयार झालेले कपडे उन्हाळ्यात अतिशय फायदेशीर असतात.

## सिल्क

रेशीम हे सर्वात मौल्यवान कापडांपैकी एक आहे. रेशीम त्याच्या सुंदरतेसाठी आणि आरामासाठी लोकप्रिय आहे. इतिहासात फक्त राजे आणि राजपुत्रांमध्येच रेशमी पोशाख वापरले गेले आहेत. रेशीम उन्हाळ्यात थंडावा आणते, त्यामुळे वाढत्या तापमानासोबत त्याची मागणीही वाढते.काही वर्षांपूर्वीपर्यंत, रेशीम फक्त रेशीम किड्यांपासून मिळत होते, परंतु पर्यावरणप्रेमी आणि शाकाहारी कापडांच्या वाढत्या मागणीमुळे फॅशन उद्योगाला रेशीम मिळविण्याच्या नवीन पद्धतींचा अवलंब करण्यास भाग पाडले. अलिकडच्या काळात, सेंद्रिय रेशीममधील एरीमोथ तयार करण्यासाठी मारले जात नाही, परंतु ते पूर्णपणे तयार केले जाते आणि फुलपाखरू म्हणून उडण्यास परवानगी दिली जाते, त्यानंतर कोकूनमधून रेशीम तयार केले जातात. रेशमाचे हे पर्यावरणपूरक प्रकार अद्याप मुख्य प्रवाहात आलेले नाहीत, परंतु चांगली बातमी अशी आहे की फॅशन उद्योगाने योग्य दिशेने वाटचाल सुरू केली आहे.

## लिनेन

वाढत्या तापमानापासून स्वतःच आणि आपल्या शरीराचं बचाव करण्यासाठी कॉटनपाठोपाठ लिनेन हे फॅब्रिक अतिशय उत्तम आहे. लिनेन हे अतिशय सैल असं तयार केलेलं फॅब्रिक आहे. हे फॅब्रिक अतिशय मोकळं ढाकळं आहे. उन्हाळ्यात येणारा घाम लिनेनमध्ये शोसला जातो. महत्वाचं म्हणजे लिनेनच्या उत्तम डिझाइन आणि योग्य रंग याचा मेळ खूप छान इम्पॅक्ट करतं. पार्टी वेअर असो वा फॉर्मल किंवा कॅज्युअल तुम्ही कधीही वापरू शकता.

## चाम्ब्रे

चाम्ब्रे हे एक पातळ आणि हलकं फॅब्रिक आहे. हे फॅब्रिक डेनिम सारखं आहे. चेंबरे हे एक पातळ आणि हलके फॅब्रिक आहे जे डेनिमसारखे दिसते. हे साधे विणलेले कापड कापसापासून बनवले जाते. ते तयार करण्यासाठी, थ्रेड्स एकमेकांशी गुंफलेले असतात, जे क्रिस-क्रॉस स्ट्रक्चर बनवतात. पायघोळ, शर्ट, जॅकेट, टॉप, शॉर्ट्स आणि अनेक प्रकारचे पोशाख चाम्ब्रेपासून तयार केले जातात. कडक उन्हाळ्यात डेनिम प्रेमींसाठी एक योग्य पर्याय. कॉटन जर्सी चाम्ब्रेसोबत असेच एक फॅब्रिक आहे, जे उन्हाळ्यात ट्राउझर्ससाठी उत्तम पर्याय आहे.

## खादी

खादी हे भारताच्या भावनांशी निगडित कापड आहे. स्वदेशी चळवळीत या फॅब्रिकला खूप लोकप्रियता मिळाली आणि तेव्हापासून ते लोकांच्या पसंतीस उतरले आहे. खादीचे कापड हाताने विणून तयार केले जाते आणि याच गुणवत्तेमुळे ते इतर कापडांपेक्षा वेगळे बनते. खादी एकतर कापसाच्या तंतूपासून किंवा रेशीमपासून बनविली जाते. पारंपारिकपणे, खादी सांस्कृतिक पोशाख म्हणून लोकप्रिय आहे. पण बदलत्या काळानुसार, अलीकडच्या काही वर्षांत अनेक ब्रँड्सनी इंडो-वेस्टर्न फ्युजन तयार करण्यासाठी त्याचे प्रयोग केले आहेत. आजच्या काळात, फॅशन इंडस्ट्री कोणत्याही प्रश्नाशिवाय खादीची क्षमता स्वीकारत आहे आणि लोक त्याचा अवलंबही करत आहेत.



# ५ अत्यंत महत्त्वाचं समर वॉर्डरोब!

**उन्हाचा तडाखा प्रचंड आहे. डोक्यावर तळपणारा सूर्य हैराण करत आहे. गरमीमुळे सगळेच हैराण झालेत. उन्हाळा तर त्याच्या वेळेनुसार निघून जाईलच पण तोपर्यंत आपली काळजी घेणं अत्यंत गरजेचं आहे. यावेळी आरोग्यासोबत आपण हलक्या फुलक्या कपड्यांच्या माध्यमातूनही स्वतःची काळजी घेऊ शकता. पण उन्हाळ्यात कोणत्या कपड्यांची निवड करावी हे सर्वात महत्वाचं आहे. अशावेळी या ५ वॉर्डरोब कलेक्शन ठरतात खूप महत्वाचे. उकाड्यातील हे हलके फुलके कपडे देखील तुम्हाला देतील थोडा आराम. या कपड्यांमुळे तुमची फॅशन स्टेटमेंट देखील मेंटेंट राहू शकते. महत्वाचं म्हणजे हे समर कलेक्शन तुम्ही कधीही कॅरी करू शकता. कोणत्याही फंक्शन करता हे ५ कलेक्शन बेस्ट ऑप्शन आहे.**



### व्हाइट ड्रेस

गरमीत बाहेर जाताना काय घालावं यावर उपाय म्हणून एकच उत्तर ते म्हणजे फ्लोय व्हाइट ड्रेस. हा ड्रेस अतिशय हलका, मोकळा-ढाकळा, सुंदर आणि कोणत्याही पार्टी किंवा कोणत्याही आऊटिंगकरता परफेक्ट आहे. महत्वाचं म्हणजे मिनी ते अगदी मॅक्सीच्या आकाराचे हे ड्रेस अतिशय आकर्षक आहेत. या आऊटफिटला तुम्ही जर दिवसाकरता निवडत असाल तर लिनेन किंवा कॉटनचे निवडा. नाइटपार्टीकरता प्लान असेल तर सॅटिन फॅब्रिकमध्ये रिबिन या रफल्स वर्कसोबत हलक फुलकं काम केलेल्या ड्रेसची निवड करा. रात्रीच्या गरमीकरता ही निवड परफेक्ट आहे.

### सूदिंग पेस्टल



उन्हाळ्यात पेस्टल आऊटफिट्स सारखा दुसरा रंग नाही. तसेच पाऊडर ब्लू बेबी डॉल ड्रेस या रोझ पिंक स्लिप ड्रेस घालून परी सारखं फिल करणं अत्यंत गरजेचं आहे. पेस्टल रंग अविश्वसनिय रंगाने स्वतःला वर्सेटाइल वाटतं. या रंगाला तुम्ही प्रोफेशनली देखील घालू शकता. ऑफिसमध्ये देखील या रंगाचे कपडे अतिशय सुंदर दिसतंत. तसेच रात्रीच्यावेळी देखील या रंगाचे कपडे खूप खास दिसतात.

### फेमिनिन फ्लोरल

फ्लोरल या ऋतुतील लोकप्रिय प्रिंट आहे. फ्लोरल प्रिंट अतिशय फेमिनिन आणि एलिगेंट आहे. या फ्लोरल प्रिंटकडे सगळ्यांच लक्ष वेधलं जातं. हा ड्रेस पिकनिक, आऊटफिट्स, ब्रंच डेट, संध्याकाळची कॉफी डेट किंवा अगदी पार्कात फिरण्यासाठी हा ड्रेस कोड परफेक्ट आहे. एवढंच काय तर अगदी इंटिमेट डेनर डेट करता देखील फेमिनिन फ्लोरल प्रिंट ड्रेसची निवड ही परफेक्ट असते.

### रंगीत आऊटफिट

ज्यांना वसंत आणि गरमीचं वॉर्डरोब कलेक्शन खास करायचं आहे त्यांच्या करता कलरफुल आऊटफिट सगळ्यात बेस्ट इंवेस्टमेंट आहे. यारंगीत कलेक्शनमुळे तुमचं आयुष्य देखील खूप रंगीत होतं. एकाच स्टाइलमुळे तुम्ही कंटाळलात असाल तर हे कलेक्शन सगळ्यात बेस्ट आहे. तुमच्या कम्फर्टझोनमधून बाहेर येण्यासाठी हा उत्तम पर्याय आहे. यामध्ये भगव्याचे सगळे डार्क आणि लाइट शेड, पिवळा रंग आणि हॉट गुलाबी रंगाचं कलेक्शन खास असेल.

### परफेक्ट एलबीडी

काळ्या रंगाचा शॉर्ट ड्रेस हा कायमच क्लासिक आऊटफिट ठरतो. ऋतुनुसार आणि वेळनुसार आऊटफिट्समध्ये अनेक बदल होतात. पण काळ्या रंगाचा मिनी आऊटफिट हा कायमच तुम्हाला बेस्ट फिल होतो. अगदी तुम्ही घाई गडबडीत असाल तेव्हा हा मिनी काळा ड्रेस तुमच्या ब्युटीला एनहान्स करतो. यामुळे अशा ड्रेसमध्ये गुंतवणूक करणे फायदेशीर ठरते.

# उन्हाळ्यात 'या' ५ ड्रिंक्सने मिळवा ग्लोइंग त्वचा

**उन्हाळ्याचा त्रास कुणालाही होऊ शकतो आणि उष्णतेवर मात करण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे थंड ताजेतवाने पेय. उन्हाळ्यातील पेये केवळ फॅशनेबल दिसायलाच चांगली नाहीत तर ते हायड्रेटिंग, समाधानकारक, अतिशय उपयुक्त आणि आरोग्यदायी देखील आहेत. महत्वाच म्हणजे हे ड्रिंक्स तुमच्या शरीरासाठी, त्वचेसाठी आणि केसांसाठी चांगले आहेत. उन्हाळ्यातील उष्णता आणि डिहायड्रेशनमुळे तुमची त्वचा थकल्यासारखे होऊ शकते. जेव्हा जेव्हा शरीरातील पाणी कमी होतं तेव्हा त्वचा निस्तेज जाणवते. हा त्रास उन्हाळ्यात अनेकदा प्रकर्षाने जाणवतो. उन्हाळ्यात डिटॉक्स ड्रिंक आणि इतर उन्हाळी पेये वापरल्यामुळे शरीर स्वच्छ ठेवण्यासोबतच उर्जा पातळी वाढवण्यास मदत करते. ही पेय पचन सुधारतात, वजन कमी करण्यात मदत करतात आणि हायड्रेट करतात आणि तुमच्या त्वचेचा पोत सुधारतात.**



- लिंबू आणि अद्रक याचं पेय : रोज सकाळी उठल्यावर लिंबू आणि अद्रक याचं मोठं ग्लास भरपूर पेय प्यावं. यामुळे तुमची मेटापॉलिझम वाढतं पण सोबतच तुम्हाला अतिशय शांत आणि अलर्ट राहण्यास मदत करते. लिंबाच्या रसातील एस्कॉर्बिक ॲसिड पोट साफ करण्यास मदत करते. तसेच व्यायाम केल्यानंतर कॅलरी जलद बर्न करण्यास मदत करते. फक्त १ लिंबाचा रस पिळून घ्या आणि आले किसून घ्या. दोन्ही घटक चांगले मिसळा आणि नंतर थोडे कोमट पाणी घाला. नीट ढवळून प्या.
- मँगो ज्यूस : उन्हाळा कितीही त्रासदायक वाटत असला तरीही तो हवाहवासा असतो. त्याला एकमेव कारण म्हणजे आंबा. उन्हाळ्यात फळांचा राजा आंबा आपल्या भेटीला येतो. या गरमीत स्वतःला आनंद देण्यासाठी आणि ग्लोइंग त्वचेसाठी आंब्याचा ज्यूस अतिशय फायदेशीर असतो. तुमची कामवासना वाढवणे, स्मरणशक्ती वाढवणे आणि चयापचय सुधारणे हे आंबा करू शकतो. जेव्हा आंब्याचा गर आणि आले एकत्र केल्यानंतर जे ड्रिंक तयार होते ते तुमच्यासाठी एका ट्रिटपेक्षा कमी नाही.
- काकडी ड्रिंक्स : उन्हाळ्यात काकडी खाणं कायमच फायदेशीर असतं. अनेकदा आपण काकडी नुसती कापून किंवा कधी काकडीची कोशिंबीर करून खातो. यासोबतच काकडीचे ड्रिंक देखील अतिशय फायदेशीर असते. उन्हाळ्याच्या दिवसात सोडा अथवा कोल्डड्रिंक्स पिण टाळा. परंतु त्याऐवजी काकडीचा ज्यूस निवडा. काकडीमुळे तुमच्या श्वसनास देखील फायदा होतो. तुमची त्वचा हायड्रेट करतात आणि तुमच्या मेंदूच्या आरोग्याचे रक्षण देखील केले जाते. दोन काकडीचे तुकडे करा त्यामध्ये आल्याचा छोटासा तुकडा, लिंबाचा रस आणि पुदिन्याची पाने, मध आणि चवी पुरतं मीठ टाका. यानंतर याची पेस्ट करून घ्या. त्यामध्ये अधिक प्रमाणात पाणी घाला आणि हे पेय गाळून प्या.
- फळ-भाज्यांचे ड्रिंक्स : हिरव्या पालेभाज्या देखील शरीरासाठी फायदेशीर असतात. या भाज्यांचा समावेश आपण आहार तर करतोच पण फक्त याचं ड्रिंक करून प्यायलं तरी हे गुणकारी आहे. भाज्यांमध्ये खनिजे, लोह, जीवनसत्त्वे आणि पोषक तत्वे असतात. पालक, काकडी, सेलेरी, हिरवी सफरचंद, लिंबाचा रस, पुदिन्याची पाने हे तुमचे घटक आहेत! तुम्हाला फक्त मिश्रण करत राहायचे आहे.

## कलिंगडाचे ज्यूस

या दिवसात कलिंगड ही आवडीने खाल्ला जातो. अशावेळी कलिंगडाचा ज्यूस देखील ठरतो अतिशय फायदेशीर. कलिंगडाचा ज्यूस प्यायल्यामुळे शरीराला तजेल राहण्यास मदत करते. किडनी स्टोनचा त्रास असल्यास जरूर खा कलिंगड - ज्यांना किडनी स्टोनचा त्रास असेल अशा व्यक्तींनी जरूर कलिंगड खावे. कारण कलिंगडामध्ये पाण्याचे प्रमाण अधिक असते. तसेच किडनी साफ करण्यास कलिंगडाची मदत होते. त्यामुळे हे खाणे फायदेशीर ठरते. तसेच वजन कमी करण्याही या ज्यूसची मदत होते.





# ‘आरटीई’ कोट्यातून ६४ हजार प्रवेश

## रिक्त जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी

**पुणे (प्रतिनिधी)** – शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत सोडतीद्वारे प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची मुदत संपुष्टात आली. त्यानुसार, सोमवारी रात्रीपर्यंत ६४ हजार ४८८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले होते. आता उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी दिली जाणार आहे.

प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आरटीई प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यंदा राज्यातील ८ हजार ८६३ शाळांमध्ये १ लाख ९ हजार ८७ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आ-हेत. त्यासाठी ३ लाख ५ हजार १५२ अर्ज आले होते. प्रवेशासाठी काढलेल्या सोडतीद्वारे १ लाख १ हजार ९६७ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यानंतर प्रवेशपात्र विद्यार्थ्यांसाठी प्रवेशफेरी सुरू करण्यात आली. मात्र, त्याला फारसा प्रतिसाद न मिळाल्याने १० मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या मुदतीत ६४ हजार ४८८ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी म्हणाले, ‘आरटीई प्रवेश प्रक्रियेत सोडतीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी पुरेसा वेळ देण्यात आला. त्यामुळे आणखी मुदतवाढ न देण्याचा निर्णय घेण्यात आला.

आता उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी दिली जाणार आहे. त्यासाठी स्वतंत्रपणे माहिती दिली जाईल.’ दरम्यान, आरटीई संकेतस्थळावरील सोमवारी रात्रीपर्यंतच्या आकडेवारीनुसार, पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ११ हजार ११४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला. त्या खालोखाल ठाणे जिल्ह्यात ६ हजार ५४८, नागपूर जिल्ह्यात ३ हजार ३६५, नाशिक जिल्ह्यात ३ हजार २३९, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात २ हजार ३३६, अहिल्यानगर जिल्ह्यात २ हजार ३१९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

## दोन मिनिटांच्या उशीरामुळे स्पर्धा परीक्षा हुकली

**नाशिक(प्रतिनिधी):** स्पर्धा परीक्षेसाठी अवघ्या दोन मिनिटांचा उशीर झाल्याने महिला उमेदवाराला परीक्षा केंद्रात प्रवेश नाकारण्यात आला. यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये प्रशासनाच्या आडमुठे धोरणाविरोधात रोष व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, समाज कल्याण आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

सामाजिक न्याय आयुक्तालयांतर्गत उच्च श्रेणी लघु-लेखक पदासाठी १२ मार्च रोजी स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर ८:३० पर्यंत हजर राहण्याची सूचना देण्यात आली होती. परीक्षा केंद्र नाशिकरोड परिसरातील राष्ट्रसंत आचार्य आनंद ऋषीजी स्कूल येथे होते. परीक्षेची वेळ सकाळी नऊ ते ११ अशी होती. सिन्नर येथील महिला उमेदवार सकाळी ८:३२ वाजता परीक्षा केंद्रावर पोहोचल्या.

# यंदा बी.एड् अभ्यासक्रमाला प्रतिसाद वाढला

## प्रवेश परीक्षेसाठी १ लाख १६ हजार ५०० विद्यार्थ्यांची नोंदणी

**मुंबई (प्रतिनिधी)** – शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्रातील पदवीसाठी आवश्यक असलेल्या बी.एड (सामान्य व विशेष), बीएड्-एमएड, एमएड आणि एम.पी.एड या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रीक्षेला नोंदणीला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. बीएड अभ्यासक्रमासाठी पाच वर्षांतील विक्रमी अर्जनोंदणी झाली असून यंदा एक लाख १६ हजार ५०० विद्यार्थ्यांनी शुल्क भरून अर्ज निश्चित केले आहेत. त्यामुळे या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी चुरस रंगणार आहे.

शिक्षणशास्त्राअंतर्गत येणाऱ्या बी.एड (सामान्य व विशेष), बीएड-एमएड, एमएड या अभ्यासक्रमांना तर शारीरिक शिक्षणशास्त्राअंतर्गत येणाऱ्या एम.पी.एड या अभ्यासक्रमांच्या या प्रवेश परीक्षा मार्चमध्ये होणार आहेत. त्यासाठी राबविण्यात आलेली नोंदणी प्रक्रिया २८ फेब्रुवारी रोजी संपुष्टात आली. मात्र अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज अर्धवट असल्याने व अनेकांनी शुल्क भरलेले नसल्याने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने विद्यार्थ्यांना अर्ज पूर्ण करण्यास, अर्जाच्या तपशीलात दुरुस्ती करणे तसेच शुल्क भरण्यासाठी ५ मार्चदरम्यान संधी दिली होती. या संधीचा अनेक विद्यार्थ्यांनी लाभ घेत नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली आहे. त्यानुसार यंदा बीएड अभ्यासक्रमासाठी राज्यभरातून १ लाख १६ हजार ५०० विद्यार्थ्यांनी अर्ज नोंदणी केली आहे. मागील पाच वर्षांमधील ही सर्वाधिक अर्ज नोंदणी आहे. गतवर्षी बीएड अभ्यासक्रमासाठी ७९ हजार ८३ विद्यार्थ्यांनी २०२३-२४ मध्ये ७९ हजार ९८४ विद्यार्थ्यांनी २०२२ २३ मध्ये ८७ हजार ८७८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यंदा ही परीक्षा २४ मार्च रोजी होणार आहे. बीएड-एमएड प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येतही काहीअंशी वाढ झाली आहे. बीएड-एमएड अभ्यासक्रमासाठी १ हजार १३० विद्यार्थ्यांनी अर्ज केले. गतवर्षी १ हजार ३६ विद्यार्थांनी अर्ज केले होते. ही परीक्षा २८ मार्च रोजी होणार आहे. एमएड अभ्यासक्रमासाठी यंदा ३ हजार ८०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. गतवर्षीच्या तुलनेत यंदा ९०० विद्यार्थ्यांची वाढ झाली आहे. गतवर्षी एमएडसाठी २ हजार ९८५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. ही परीक्षा १९ मार्च रोजी होणार आहे.

## पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना राज्यपालांचे अभिवादन

**मुंबई (प्रतिनिधी)** – देशाचे माजी उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे तसेच राजभवनातील अधिकारी, कर्मचारी व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिवंगत यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

# जनतेने जास्त व्याज देणाऱ्या योजनांच्या प्रलोभनाला बळी पडू नये –मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील जनतेने जास्त व्याज देणाऱ्या योजनांच्या अमिषास बळी पडू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेमध्ये केले. सदस्य शशिकांत शिंदे यांनी टोरेस घोटाळा प्रकरणी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

जादा व्याज देणाऱ्या ९९ टक्के योजना या फसव्या असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोणीही अशा प्रकारे जादा व्याज देऊ शकत नाही. बँकेच्या व्याजदरापेक्षा दोन ते चार टक्के जास्ती व्याज दिले जाणे शक्य आहे. पण त्यापेक्षा जास्त किंवा भरघोस व्याज देणे कोणालाही शक्य होत नाही. त्यामुळे असे जादा व्याजाचे अमिष देणाऱ्या योजना फसव्याच असतात. त्यांच्या अमिषाला जनतेने बळी पडू नये आणि अशा फसव्या योजनांमध्ये गुंतवणूक करू नये असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तसेच प्रश्नाला उत्तर देताना गृह राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, राज्यातील गुंतवणूक तसेच अर्थिक व्यवहार करणाऱ्या संस्थांवर देखरेखीसाठी इकॉनॉमिक इंटेलिजन्स युनिटची स्थापना करण्यात येत आहे. तसेच टोरेस प्रकरणी फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्यासाठी कायदेशीर प्रक्रियेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.


## कागदपत्र हरवली

मी देगलूर ते नांदेड या बसने प्रवास करीत असताना माझी गायकवाड अनिरुद्ध मारोतीराव या नावाची दहावी, बारावी पासची टीसी व मार्क मेमो तसेच जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आणि इतर कागदपत्र हरवली आहेत. सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा. योग्य ते बक्षीस दिले जाईल

**–संपर्क पत्ता–**
**गायकवाड अनिरुद्ध मारोतीराव**
**नगरेश्वर नगर, देगलूर जिल्हा नांदेड.**
**मोबा. नं. ७८४३०५२८३०**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## जाहीर प्रगटन

संचिका क्रमांक. ६१०/२०२४ २०२५/क्षे.का.क्र.६ सिडको
प्रकरण :- नांव परिवर्तन करणे बाबत.

जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्री महेश गणेशराव शिवलवाड, उमेश पि.गणेशराव शिवलवाड, दिनेश पि.गणेशराव शिवलवाड रा.सिद्धनाथपुरी नांदेड मौजे कौठा या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की,मनपा सिडको घर क्रमांक गट नंबर २५४ पैकी प्लॉट नंबर ५८ येथील एकूण क्षे.११२.५० चौरस मीटर ज्याची मनपा मालमत्ता क्र.१०-२ पिन ४०६१००२०९०१ पैकी श्री प्रविण ओमप्रकाश पोकर्णा,श्री अब्दुल नईम अब्दुल करीम व इतर रा.शिवाजीनगर हिंगोली अधारे नांदेड यांचे नावे नोंद असलेली मालमत्ता अर्जदाराने खरेदी खत/ विक्रीखत / बक्षीस पत्र सोसायटी कव्हेंन्स लिट,ओनर्सशिप पद्धतीचे चुक दुरूस्ती पत्र, भाडे पट्टयाचे हस्तांतरण पत्र, विक्रीखत दस्त क्रमांक ९१८२/२०२० दिनांक २४/१२/२०२० अधारे सातबारा दिनांक २/२/२०२५ वर प्राप्त झालेले आहे.

तरी त्यांचे नावाची नोंद नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत घेण्यात येत आहे. तरी या सबंधात कोणी काही आक्षेप असल्यास त्यांना हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेच्या १५ दिवसांच्याआत कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा.अन्यथा वरील अवधी संपल्यानंतर सदरील मालमत्तेवर अर्जदाराचे नावाने मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत सदरील नावाची नोंद घेण्यात येईल.

चर्तुसिमा-पुर्वेस-प्लॉट नंबर ५३, पश्चिमेस-९ मीटर रूंद रस्ता, दक्षिणेस-प्लॉट नंबर ५९,उत्तरेस-प्लॉट नंबर ५७

**क्षेत्रिय अधिकारी**
**क्षेत्रिय कार्यालय क्र.६ सिडको**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार गुरूराज पि.रामराव पाटील रा.वाजेगाव ता.जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार हे वाजेगाव ता.जि.नांदेड शेत शिवार मौजे फत्तेपुर ता.जि.नांदेउ येथील शेत गट नंबर ५५ क्षे.३ हेक्टर ३९ आर आकार रूपये १२.०० पैसे पैकी ० हेक्टर २५ आर ज्याची चर्तुसिमा पुढील प्रमाणे पुर्वेस- सखाराम मारोती संगेकर यांचे शेत,पश्चिमे-विक्री करणार यांचे उर्वरीत शेत,दक्षिण-नांदेड शिकारघाट रोड,उत्तरेस-सखाराम मारोती संगेकर व शामराव ग्यानोबा संगेकर यांचे शेत आहे.

सदरील जमिन माझे पक्षकार यांनी नोंदणी कृत खरेदी क्र.४२६८/२००२ दिनांक २६/११/२००२ द्वारे खरेदी केलेली आहे.सदर जमिनीबाबतचा मुळ नोंदणीकृत खरेदीखत क्र.४२६८/२००२ दिनांक २६/११/२००२ हे चुकून हरवले आहे. माझे पक्षकार यांनी दिनांक ४/३/२०२५ रोजी सदरील नोंदणीकृत खरेदी क्र.४२६८/२००२ दिनांक २६/११/२००२ त्यांच्याकडून हरवल्याबाबत पोलीस स्टेशन शिवाजीनगर नांदेड येथे रितसरपणे अर्ज दिलेला आहे.तरी सर्व जनतेस व संबंधीतांस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचीत करण्यात येते की, जर कुणास सदरील व नमूद जमिनीबाबतचे मुळ नोंदणीकृत खरेदी क्र.४२६८/२००२ दिनांक २६/११/२००२ हे सापडल्यास कृपया खालील दिलेल्या पत्यावर आणून द्यावे.सदरील हरवलेले दस्त आणुण देणाऱ्यास योग्य ते बक्षीस देण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

| मार्फत | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| ॲड.दिपक बियाणी | गुरूराज पि.रामराव पाटील |
| नांदेड मो.९०२८९८२१५० | रा.वाजेगाव ता.जि.नांदेड |

## जाहीर प्रगटन

दुसरे सह दिवाणी न्यायालय क.स्तर लोहा ता.लोहा जि.नांदेड यांच्या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र.१०७/२०१९ मिरा माधव टर्के वि.माधव बापुराव टर्के व इतर

वादी आणि वकील १.मिरा माधव टर्के वय ३५ वर्षे धंदा घरकाम

वकील-सुयुफझई एम.एस २.सुशिल माधव टर्के वय १३ वर्षे धंदा शिक्षण वकील-सुयुफझई एम.एस ३.अजय माधव टर्के वय १० वर्षे धंदा शिक्षण वकील-सुयुफझई एम.एस ४.चेतना माधव टर्के वय ९ वर्षे धंदा शिक्षण वकील-सुयुफझई एम.एस

प्रतिवादी आणि वकील-१.माधव बापुराव टर्के वय ३६ वर्षे धंदा निरंक रा.किवळा ता.लोहा जि.नांदेड २.सोनु गणेश लव्हेकर वय ३० वर्षे धंदा व्यापार ३.मनिष गणेश लव्हेकर वय २८ वर्षे धंदा घरकाम ४.दिशा गणेश लव्हेकर वय २६ वर्षे धंदा घरकाम सर्व रा.लक्ष्मीलक्ष्मण निवास माणिकनगर नांदेड

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांस कळविण्यात येते की, वादी मिरा माधव टर्के यांनी या न्यायालयात प्रतिवादी विरूद्ध स्वतंत्र्य ताब्या बाबत दावा दाखल केला आहे. उपरोक्त प्रतिवादी क्र.२ सोनु गणेश लव्हेकर वर्षे ३० धंदा व्यापार रा.लक्ष्मीलक्ष्मण निवास माणिकनगर नांदेड, मारोती लव्हेकर,२२ माणिकनगर तरोडा खुर्द नांदेड यांना या न्यायालयात जबाब देण्यास सादर करण्यासाठी समन्स पाठविले असता सदर असलेल्या पत्यावर घरी कोणीही मिळवून आले आहे. असे वादीचे म्हणणे आहे.

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्या विरूद्ध वरील दावा विषयाबाबत दाखल केला आहे. म्हणून सदर दाव्याचा जाबाब देण्यासाठी तुम्हाला या जाहीर प्रगटनाद्वारे निर्देशीत केले जाते की, आपण स्वता किंवा विधिज्ञ मा र्फत दिनांक ११/४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजात लोहा येथील दुसरे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर लोहा यांच्या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी जाहीर समन्स काढण्यात येत आहे. आपण सदर दाव्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक ११/४/२०२५ रोजी स्वता किंवा विधिज्ञ हजर होवून आपले म्हणणे लेखी स्वरूपात या न्यायालयात द्यावे.मुदतीत आपण हजर होवून आपले म्हणणे सादर केले नाही तर आपणास सदर नोटीस बजावणी होवून ही आपणास काही सांगायचे नाही असे समजून मा.न्यायालयाचे सदर कामी यथायोग्य हुकूम होईल यांची नोंद घ्यावी.आज दिनांक २५/२/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरुन**

**क.लिपीक** | **सहाय्यक अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क.स्तर लोहा**

## जाहीर प्रगटन

मौजे तरोडा खुर्द ता.जि.नांदेड मनपा हद्दीतील शेत सर्व्हे गट नंबर २०८ मधील प्लॉट नंबर ४३ चा भाग साईज ४० बाय १५ एकूण क्षे.६०० चौरस फुटाचा प्लॉट शांता दत्ता वाघामरे रा.शिवाजीनगर ज्योती टॉकीज जवळ नांदेड यांचेकडून प्रकाश तुकाराम गच्चे रा.प्रभातनगर नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चर्तुसिमा पुढील प्रमाणे-पुर्वेस-प्लॉट नंबर ४३ चा भाग, पश्चिमेस -प्लॉट नंर ४२ चा भाग,दक्षिणेस-अंतर्गत रस्ता, उत्तरेस-प्लॉट नंबर ६ चा भाग.

तरी वरील चर्तुसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क,उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा.मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदी खत करून येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**प्रकाश तुकाराम गच्चे**
**रा.प्रभात नगर नांदेड**
**मो.८८८८८०१९६०, ९६०४०८६५२३**


# CONSULTING PHYSIOTHERAPIST

## कन्सल्टिंग फिजिओथेरपीस्ट



डॉ.ईश्वर जी. हिंगोलीकर (PT) (B.P. Th)

उपलब्ध सुविधा
- कपिंग थेरपी (गोल्ड मेडलिस्ट)
- ड्राय नीडलींग थेरपीस्ट
- ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन
- टेपींग थेरपीस्ट
- न्यूरो रिहॅबिलिटेशन

नांदेड
होम व्हिजीट उपलब्ध 9657631231

ऑफर ऑफर A/C ऑफर

# म हा रा ष्ट्र जेन्टस् ब्युटी सलुन

**फेशियल**
१) गोल्ड फेशियल 499/-
२) VLCC फेशियल 499/-
३) डायमंड फेशियल 599/-

**डी-टॅन**
१) O3+ 349/-
२) रागा 299/

**ब्लीच**
१) ऑक्सी ब्लीच 299/-
२) ओलिविया ब्लीच 299/-

**कलर**
१) लोरियल 299/-
२) मॅट्रिक्स 299/-
३) रागा 249/-
४) गार्नियर 199/-

**हेयर स्पा**
१) लोरियल 249/-
२) मॅट्रिक्स 249/-



हॉटेल मंजू समोर, वजिराबाद, नांदेड. 9822972221


## महावितरण — अल्प मुदत ई-निविदा सूचना

महावितरणकडे सक्षम कंत्राटदार यांचेमार्फत महावितरण कंपनीच्या स्थापत्य विभाग नांदेड अंतर्गत ३३/११ केव्ही उपकेंद्र कळमनुरी ता. कळमनुरी जि. हिंगोली येथे कर्मचारी निवासस्थानाची स्थापत्य दुरुस्तीच्या कामा करिता SEC / CSN/T-35/2024-25 नुसार अधीक्षक अभियंता (स्था.), महावितरण, छ. संभाजीनगर, ई-मेल:- seccsn@mahadiscom.in; यांचेमार्फत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सूचना व निविदा प्रपत्र महावितरणचे http://etender.mahadiscom.in/eatApp या संकेत स्थळावर दि. १३.०३.२०२५ ते दि. १९.०३.२०२५ पर्यंत उपलब्ध आहे. सर्व निविदा या संकेत स्थळावर दि. २०.०३.२०२५ रोजी सकाळी १४:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यास येतील. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करणेचे अधिकार राखून ठेवलेले आहे.

<u>टिप :-</u> जर विहित कालावधीत निविदा विकल्या गेल्या नाहीत तर सदरील निविदा विकण्याची कालावधी ऑनलाईनच वाढविण्यात येईल व त्या करिता कोणतेही शुद्धिपत्रक वा निवेदन वर्तमानपत्रात पुन्हा प्रकाशित करण्यात येणार नाही. नोंदणीकृत एजन्सी यांनी या संबंधीच्या सूचना महावितरण कंपनीच्या वरील संकेतस्थळावर वेळोवेळी तपासणी करत राहावी.

**PRO No. Nanded / 044 / 2024-25**

**अधीक्षक अभियंता (स्था.) छ. संभाजीनगर**

Shri Chatrapati Shivaji Maharaj Shikshan Sanstha's

# Shri Shankarrao Chavan Rural D. Ed College

Londhe Sangvi, Post Joshi Sangvi Osmannagar, Tq Loha Dist, Nanded-431707
NCTE Code APW 04301/122963

**Wanted**

| Sr No | Disg | No of Post | |
|---|---|---|---|
| 1 | Principal | 1 | M.A. M.Ed/ M.A.Education With 50% Marks Teaching Exprience 5 Year in D.Ed. College. |
| 2 | Lecturer in Perspectives in Education | 1 | M.A. M.Ed/ M.A.Education With 50% Marks |
| 3 | Lecturer in Science | 1 | M.Sc. M.ed/ With 50% Marks |
| 4 | Lecturer in Maths | 1 | M.Sc. /M.ed/ With 50% Marks |
| 5 | Lecturer in Social Sciene & Humanities | 1 | M.A. /M.ed/ M.A. Education With 50% Marks |
| 6 | Lecturer in Language | 2 | M.A. /M.ed/ M.A. Education With 50% Marks |
| 7 | Lecturer in Fine art And Performg Art | 1 | M.A.Music / Dance M.D. M.A. Education With 50% Marks |
| 8 | Lecturer in Phy Education | 1 | M.A. M.P.ed With 50% Marks |
| 9 | Office Superintendent | 1 | Any Gradnte With MSCIT |
| 10 | Store Keeper | 1 | Any Gradnte |
| 11 | Computer Lab Assitant | 1 | B.E.A. or B.E / BTech |
| 12 | Librarian | 1 | M.A. M.Lib |
| 13 | Peon | 1 | SSC Pass |

- Attend Interview With Orighal Document Adhar card, Pan and Photo
- Reservation As Per Govt of Maharashtra, Policy
- Pay Scale as Per Govt of Maharashtra, Rules
- No TA / DA Will Be Paid For Attend Interview
- Interview As on 13/3/2025 At 11.00 am as College Campus Londhe sangvi

| Principal | Secretary |
|---|---|
| Shri Shankarrao Chavan Rural D.ed Londhesangvi Tq. Loha Dist. Nanded | Shir Chatrpati Shivaji Maharaj Shikshan Sanstha, Londhe sangvi Tq. Loha Dist. Nanded |

Shri Sevadas Shikshan Prasarak Mandal's

## Mahatma Gandhi D.Ed College Cidco New Nanded

**NCTE CODE APW3419/122575**

## WANTED

| Sr No. | Designation | No. of Post | Qualification |
|---|---|---|---|
| 1. | Principal | 01 | M.A. M.Ed/ M.A. Education With 50 % marks, Teaching Experience 5 years in D.ed college. |
| 2. | Lecturer In Perspectives In Education | 01 | M.A. M.Ed/ M.A. Education with 50% marks |
| 3. | Lecturer In Science | 01 | M.Sc. M.Ed with 50% marks |
| 4. | Lecturer In Mathematics | 01 | M.Sc. M.Ed with 50% marks |
| 5. | Lecturer In Social Science & Humanities | 01 | M.A. M.Ed/ M.A. Education with 50% marks |
| 6. | Lecturer In Language | 01 | M.A. M.Ed/ M.A. Education with 50% marks |
| 7. | Lecturer In Fine Art And Performing Art | 01 | M.A. Music/Dance with 50% marks |
| 8. | Lecturer In Physical Education | 01 | M.A. M.P.Ed with 50% marks |
| 9. | Office Superintendent | 01 | Any Graduate With MS-CIT |
| 10. | Store Keeper | 01 | Any Graduate |
| 11. | Computer Lab Assistant | 01 | B.C.A. OR B.E./ B.Tech. |
| 12. | Librarian | 01 | M.A. M.Lib |
| 13. | Peon | 02 | SSC Pass |

- Attend Interview With Original Documents, Adhar Card, Pan Card and Photo
- Reservation As Per Govt. Maharashtra.
- Pay Scale As Per Govt. Of Maharashtra.
- No TA/DA Will Be Paid For Attend Interview.
- Interview as on 17/03/2025 At 1:00 pm as College Campus Cidco New Nanded.

| Principal | Secretary |
|---|---|
| Mahatma Gandhi D.Ed College, Cidco New Nanded. | Shri Sevadas Shikshan Prasarak Mandal, Nanded. |

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट, पहिला मजला, शिवाजी नगर, नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# पोलीस पाटलांचा मेळावा व कार्यशाळा उत्साहात




**नांदेड (प्रतिनिधी) –** पोलीस प्रशासन आणि समाज यांचा एक घनिष्ट संबंध असतो. पोलिसांच्या कामकाज पध्दतीचा परिणाम समाजावर पडत असतो. पोलीस प्रशासन २४ तास समाजासाठी कार्यरत असतात. अशा वेळी दैनंदिन कामकाजाशिवाय सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून विधायक कार्य करण्याकरीता पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या संकल्पना व मार्गदर्शनाखाली 'मिशन सहयोग' अंतर्गत पोलीस पाटील यांचा मेळावा आणि कार्यशाळा घेण्यात आली.

'मिशन सहयोग' अंतर्गत ऑपरेशन बीट कनेक्ट, मिशन उडान, ऑपरेशन वारसा जतन, नांदेड पोलीस लीग, मिशन महिला सुरक्षा, मिशन समाधान, मिशन निर्धार आणि मिशन एकता उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

त्यांचाच एक भाग म्हणून पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेशन बीट कनेक्ट अंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक गावाची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल यांच्यामध्ये संवाद वाढण्यासाठी दि. ११ मार्च रोजी सकाळी साडेआठ वाजता पोलीस मुख्यालय, कवायत मैदान येथे क्रिकेट व व्हॉलीबॉल, तसेच महिला पोलीस पाटील यांच्यासाठी संगीत खुर्ची सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यातील ३४ पोलीस पाटील यांना उत्कृष्ट कामगिरी करीता सत्कार करून सन्मानित करण्यात आले.

त्यानंतर पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल यांच्याकरीता पोलीस पाटील मेळावा व नविन कायदे विषयक मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्यायाधीश दलजीतकौर जज यांनी नविन कायदे विषयक तरतुदीची माहिती आणि पोलीस पाटील यांच्या कर्तव्याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराय धरणे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, राखीव पोलीस निरीक्षक विजय धोंडगे यांच्यासह पोलीस अधिकारी, अंमलदार, कर्मचारी व जिल्ह्यातील जवळपास ५०० ते ६०० पोलीस पाटील व ग्राम सुरक्षा दलाचे सदस्य उपस्थित होते. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलीस पाटलांचा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार आणि न्यायाधीश दलजीतकौर जज यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# अभिनव उपक्रम: नांदेड ग्रामीण पोलिसांनी सुरु केली सराईत गुन्हेगार दत्तक योजना

**नांदेड (प्रतिनिधी) –** पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन फ्लॅश आउट अभियानांतर्गत नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी आपल्या हद्दीमध्ये सराईत आरोपी दत्तक योजना सुरू केली आहे. या योजनेमध्ये ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये राहणारे अट्टल गुन्हेगार आहेत. ज्यांच्यावर ३ पेक्षा जास्त गुन्ह्यांची नोंद आहे. जे वारंवार गुन्हे करतात. ज्यांच्यावर कारवाई करूनही पुन्हा त्यांच्याकडून गुन्हे घडले आहेत अशा आरोपींसाठी सदरची दत्तक योजना राबविण्यात येत आहे.

सदर योजनेमध्ये गुन्हे शोध पथकाच्या (डीबी) अंमलदार यांना प्रत्येकी पाच सराईत आरोपी वाटून देण्यात आलेले आहेत. हे प्रत्येक आरोपी कुठे राहतात? काय काम करतात? सध्या त्यांच्या काय हालचाली आहेत? ते गावात आपल्या घरी राहतात का? की बाहेरगावी कामाला गेलेले आहेत, याबाबत सविस्तर माहिती ठेवली जाणार आहे. या सराईत आरोपीला रोज 'डीबी'च्या अंमलदारांमार्फत घरी जाऊन तपासले जात आहे. सदर आरोपीचे मित्र कोण त्यांच्या नावाची यादी बनवली जात आहे. सदर आरोपी कुठल्या ठिकाणावर बसतात? कुठून कुठे जातात? काय करतात? यावर बारकाईने लक्ष दिले जात आहे.

सदर आरोपीचे सोशल अकाउंट फेसबुक, इंस्टाग्राम, स्नॅपचॅट याच्यावर बारकाईने लक्ष ठेवून हे कोणत्या पद्धतीच्या पोस्ट करतात? काय पोस्ट करतात? त्यांच्या पोस्टला कोण कॉमेंट्स करते? याबाबत सविस्तर नोंदी घेण्यात येत आहेत.

सदर आरोपीकडून त्यांच्या शेजारचे गावातील एरियामधील नागरिक यांच्याकडून त्यांच्या वर्तनाबद्दल माहिती काढली जात आहे. सदर आरोपीस आठवड्यातून एक दिवस पोलीस स्टेशनला आणून त्यांचे समुपदेशन करण्यात येत आहे. सराईत आरोपी याला सुधारण्याची पुरेपूर संधी देण्यात येत आहे. पोलीस स्टेशनला आणून त्याचे समुपदेशन केले जात आहे. सराईत आरोपी याचे वर्तन योग्य नसेल आणि पोलिसांच्या समुपदेशाने तो सुधारणा होणारा नसेल तर अशा आरोपीवर एम.पी.डी.ए., हद्दपारीची कारवाई करण्यात येत आहे.

सराईत गुन्हेगारांचे आत्तापर्यंत १८ एमपीडीए प्रस्ताव पाठविले आहेत तर मुंबई पोलीस अधिनियम कलम ५५, ५६ प्रमाणे एकूण ५२ सराईत आरोपींना हद्दपार करण्यासाठी प्रस्ताव पाठविलेले आहेत.

ग्रामीण पोलिसांकडून सराईत आरोपींना सक्त इशारा देण्यात आलेला आहे. एक तर त्यांनी गुन्हेगारी सोडून चांगली वर्तणूक ठेवावी किंवा नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनची हद्द सोडून निघून जावे, अन्यथा ग्रामीण पोलिसांकडून कायद्यातील सक्त कारवाई करण्यात येईल असा इशारा पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी दिला आहे. या उपक्रमाचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, डॉ.खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) सुशीलकुमार नायक यांनी पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांचे कौतुक केले.




**नांदेड** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांबाबत अधिसभा सिनेट सदस्य डॉ. महेश मगर यांच्या नेतृत्वात बुधवारी घंटानाद आंदोलन करण्यात आले. यावेळी नांदेड एनएसयुआयचे अजरोद्दीन शेख, किरण पडलवार, अमोल जेठे, माधव बामणीकर, सुरज शिंदे, गोविंद पाटील, अत्राम बुद्धेवाड व राष्ट्रवादी शरद पवार विद्यार्थी आघाडीचे फैसल सिद्धीकी, शिवानंद वाघरडे, योगेश शिंदे, युसूफ अन्सारी, विजय पांगरीकर आदी दिसत आहेत. (**छाया** : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

# जिल्हा परिषद शाळांच्या मालकीच्या नोंदींसाठी विशेष मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा परिषदेच्या स्वतःच्या जागेत असलेल्या शाळांची अधिकृत नोंद नमुना नंबर ८ व सातबारा उताऱ्यावर करण्याचे काम वेगाने सुरू आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या नेतृत्वाखाली हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवला जात असून, या प्रक्रियेसाठी गुगल शिटच्या माध्यमातून माहिती संकलित केली जात आहे.

या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत १ हजार ८६४ शाळांची माहिती संकलित करण्यात आली असून उर्वरित शाळांची नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. जिल्ह्यात एकूण २ हजार १९३ जिल्हा परिषद शाळा स्वत:च्या मालकीच्या आहेत. त्या सर्वांच्या मालकी हक्काच्या नोंदी शासन दरबारी होण्यासाठी गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या दोन बैठका मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये घेण्यात आल्या आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे यांच्यासह सर्व गटशिक्षणाधिकारी या मोहिमेसाठी सक्रिय सहभागी झाले आहेत. भोकर तालुक्यातील १२५ शाळांची मालकीची जागा व क्षेत्रफळ नमुना नंबर ८ वर नोंदविण्याचे काम पूर्ण झाले आहे. प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे यांनी हे काम यशस्वीरित्या पार पाडले. आता सातबारा उताऱ्यावर नोंदणी करण्याचे कामही तालुक्यात सुरू आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी उर्वरित १५ तालुक्यांतील गटशिक्षणाधिकाऱ्यांना भोकर तालुक्याच्या धर्तीवर काम करण्याचे निर्देश दिले आहेत.

## रुक्मीनबाई पांचाळ यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील हनुमान गड परिसरातील ज्येष्ठ महिला रुक्मीनबाई विठ्ठलराव पांचाळ (बोरीकर) यांचे बुधवार दि. १२ मार्च रोजी सकाळी पाच वाजता निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा बुधवारी सायंकाळी ठिक ४ वाजता हनुमान गड येथून निघून गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातू असा परिवार आहे.

## वाई येथे कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी) –** मुदखेड तालुक्यातील वाई येथील शेतकरी रावसाहेब माणिका ढगे (वय ५३) यांनी सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून दि. १० मार्च रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची माहिती माधव मोतीराम ढगे यांनी मुदखेड पोलिसांना दिली. त्यानंतर मुदखेड पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. तपास पोलीस हवालदार कवठेकर करत आहेत.

## शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅकसाठी त्वरित नोंदणी करावी -जिल्हाधिकारी कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी) –** केंद्र आणि राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी ॲग्रीस्टॅक योजनेत नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची केवळ ३२ टक्के नोंदणी पूर्ण झाली आहे. १३ मार्च हा या विशेष नोंदणी सप्ताहाचा अंतिम दिवस असून, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपली नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

जिल्ह्यातील २ लक्ष ४५ हजार २७६ शेतकऱ्यांनी आतापर्यंत नोंदणी केली असली, तरी अपेक्षित संख्येपेक्षा हा आकडा कमी आहे. त्यामुळे १२ आणि १३ मार्च या दोन दिवसांत मोठ्या प्रमाणावर नोंदणी होण्याची प्रशासनाला अपेक्षा आहे.

सध्याच्या नोंदणीमध्ये हिमायतनगर तालुक्यात सर्वाधिक, कंधार तालुका पिछाडीवर नांदेड जिल्ह्यातील सोळा तालुक्यांमध्ये हिमायतनगर तालुक्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे, तर कंधार तालुक्यात अजूनही अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांनी नोंदणी प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वीज बील वसुली मोहीमेत अडथळा करणाऱ्यावर गुन्हा

**नांदेड (प्रतिनिधी)–** वीज बील वसुली करणारे वरिष्ठ तंत्रज्ञ बालाजी केरबा खिल्लारे यांना धनेगाव येथील थकबाकीदाराने धक्काबुक्की करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. या प्रकरणी नांदेड ग्रामिण पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३५१ (२), ३५१ (३), २९६, १८९, १८६, १३२ व ११५ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला. सदर घटनेनंतर नांदेड परिमंडळाचे मुख्य अभियंता राजाराम माने यांनी घटनास्थळी धाव घेत कर्मचाऱ्यांचे मनोधैर्य वाढविले.




**नांदेड** : वंचित बहुजन आघाडीच्यावतीन बुद्धगया येथील महाविहार बौद्ध भिख्खुंच्या ताब्यात देण्यता यावे या मागणीकरिता बुधवारी दि. १२ रोजी महात्मा फुले पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत यल्गार मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. (छाया : करणसिंह बैस)

## पुन्हा एक चोरटा 'एलसीबी'च्या जाळ्यात; पाच दुचाकी जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरासह जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या घटना लक्षात घेता पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या पथकाने कारवाई करत पुन्हा एका दुचाकी चोरट्याला अटक केली आहे. त्याच्याकडून चोरीच्या पाच दुचाकी जप्त करून नांदेड ग्रामीण ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक साईनाथ व त्यांच्या सहकाऱ्यांनी नांदेड शहरात दुचाकी चोरीच्या घटना उघडकीस आणण्यासाठी गस्त सुरू केली. जकात नाका ते असदवन रस्त्यावर एका झाडाखाली दुचाकी चोरटा थांबला असल्याची गोपनीय माहिती मिळाली. यावरून पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांच्या सहकाऱ्यांनी सापळा लावून दुचाकी चोर नवनाथ बालाजी वडजे (वय २०) राहणार कारला ता. मुखेड याला ताब्यात घेतले. त्याची अधिक चौकशी केली असता त्याने नांदेड ग्रामीण, वजिराबाद आणि इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दुचाकी चोरल्याची कबुली दिली. चोरलेल्या दुचाकी पोलिसांनी त्याच्याकडून जप्त केल्या. साईनाथ पुयड यांच्या फिर्यादीवरून नवनाथ वडजेविरुद्ध दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे आहे. जप्त दुचाकी नांदेड ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन केल्या आहेत.

# जिल्ह्यात १३ प्रकल्पांतून आतापर्यंत १ लाख ४१ हजार ८४६ घनमीटर गाळ काढला

- १०० दिवसांत १ लाख ५२ हजार घनमीटर गाळ
- यावर्षी एकूण ५३ प्रकल्पांतून ५ लाख ८० हजार ७२१ घ.मी. गाळ काढण्याचे उद्दिष्ट



**नांदेड (प्रतिनिधी) –** नांदेड जिल्ह्यात सन २०२३-२४ या वर्षात १३ प्रकल्पातून प्रायोगिक तत्वावर १ लाख ४१ हजार ८४६ घनमीटर गाळ काढला आहे. यामुळे प्रकल्पांच्या मुळ साठवण क्षमतेत वाढ झाली आहे. यावर्षी ५३ तलावातून गाळ काढण्याचे उद्दिष्ट आहे. यासंदर्भातील माहितीसाठी संबंधितानी जिल्हा संधारण अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेची आढावा बैठक नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी उपजिल्हाधिकारी रोहयो संजीव भोरे, जिल्हा जलसंधारण अधिकारी एस.एस. कांबळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी द.रा. कळसाईत, तंत्र अधिकारी के.एम जाधव, कार्यकारी अभियंता पाटबंधारे आ.शी. चौघुले, जिल्हा जलसंधारण अधिकारी जि. प अशोक भोजराज आदींची उपस्थिती होती.

राज्य शासनाने दिलेल्या कृती आराखड्यानुसार १०० दिवसांच्या कार्यक्रमात जिल्ह्यात १ लाख ५२ हजार घनमीटर गाळ काढण्याचे उद्दिष्ट दिले आहे. तसेच गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ या वर्षात एकूण ५३ प्रकल्पातून ५ लाख ८० हजार ७२१ घ.मी. गाळ काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या प्रकल्पातून गाळ काढण्याचे काम नाम फाऊडेशन, टाटा मोटार्स, भारतीय जैन संघटना तसेच स्थानिक सेवाभावी संस्था यांच्यामार्फत करण्यात येणार आहे. तसेच मृद व जलसंधारण उपविभागासाठी कार्यालय प्रमुखाचे नाव भ्रमणध्वनी क्रमांक दिले आहेत. जिल्ह्यातील ५३ तलाव वगळता इतर तलावातून गाळ काढावयाचा असल्यास तालुका निहाय अधिकारी यांच्याशी शेतकऱ्यांनी संपर्क करावा.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेअंतर्गत काम करणाऱ्या अशासकीय संस्थाना यंत्रसामग्री आणि इंधन यांचा खर्च देणे प्रस्तावित आहे. तसेच अल्प व अत्यल्पभुधारक, विधवा, अपंग व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना या योजनेचा पुरेपुर लाभ घेता येईल यासाठी अनुदान देणे प्रस्तावित आहे.

अशासकीय संस्थाना गाळ काढण्यासाठी लागणाऱ्या यंत्र सामुग्री आणि इंधन यासाठी ३१ रुपये प्रती घनमीटर व पात्र शेतकऱ्यांना शेतात गाळ पसरविण्यासाठी ३५.७५ प्रती घनमीटर प्रमाणे १५ हजारच्या मर्यादा व २.५ एकरसाठी ३७ हजार ५०० रुपयापर्यत अनुदान दिले जाणार आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com